ग्राममंगल
शिक्षणवेध
वर्ष: सहावे । अंक चौथा । ऑक्टोबर २०१६
ISBN : 978-81-927549-0-1

# अनुक्रमणिका

संपादकीय / ५
मला समजलेला रचनावाद / ७
रचनावादी कार्यशाळेचा अनुभव / केतकी बाला / २२
मनुष्यबळ विकास मंत्रालय : उपक्रम, योजना व विकास/प्राचार्य डॉ. कैलास बवले /२५
पालकत्व ही काय शिकण्याची गोष्ट आहे का?/ डॉ. दिनेश नेहते / ३०
बालस्नेही शिक्षण / गौरी पाटील / ३४
विषयांचे एकत्रीकरण : एक चर्चा / सुचिता पडळकर / ३७
पुस्तक परिचय / कल्पना बन्सोड / ४०
इ-लर्निंग / सौमित्र घोटीकर / ४३
समुपदेशकाच्या नजरेतून / गंपूदादा/किशोरीताई / ४५

■
संपादक
रमेश पानसे
■
कार्यकारी संपादक
डॉ. वैखरी वैद्य
■
व्यवस्थापकीय संपादक
प्रसाद मणेरीकर
■
संचालक
अदिती नातू
■
कार्यकारी संचालक
अजित मंडलिक
■
संपादक मंडळ
डॉ. द. ना. धनागरे,
आशिष पेंडसे
डॉ. हेमचंद्र प्रधान,
विवेक सावंत
■
सल्लागार मंडळ
डॉ. राम ताकवले ,
डॉ. जब्बार पटेल
कुमार केतकर, प्रमोद लेले
दीपक घैसास,
डॉ. चंद्रहास देशपांडे
अच्युत गोडबोले
■
आतील चित्रे
डॉ. अपर्णा कुलकर्णी
■
सजावट व मांडणी
राजश्री जाधव
■
मुद्रितशोधन
मिलिंद बोरकर

## बदललेला संपादकीय व कार्यालयीन पत्रव्यवहार

**पुणे कार्यालय**

फ्लॅट नं. १, न्यू इरा हाईट्स, गल्ली क्र. २०, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०२९

Email shikshanvedh@grammangal.org,

**मुंबई कार्यालय**

अजित मंडलिक, २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७. संवाद : ०९८६९०४९८४९

हे मासिक मुद्रक-प्रकाशक अजित मंडलिक यांनी ग्राममंगल संस्थेसाठी
इम्प्रेशन, २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७ येथे छापून त्याच ठिकाणाहून प्रसिद्ध केले.

## महत्त्वाचे निवेदन

शिक्षणवेधच्या आर्थिक परिस्थितीची सविस्तर माहिती, एप्रिल २०१६ च्या संपादकीयमधून दिली होती. या अंकातूनच आर्थिक मदतीसाठी आवाहनही केले होते. वाचकांनी या आवाहनास प्रतिसाद दिला. आणि वर्गणीदार वाढवून अथवा अन्य मार्गाने मदत करू असे सक्रिय आश्वासन देऊन शिक्षणवेधचा अंक चालूच ठेवावा असा आग्रह धरला. आम्ही आपण आमच्यावर दाखवलेल्या लोभाप्रती कृतज्ञ आहोत. त्याचाच परिणाम म्हणून आहे त्याच मूल्यामध्ये मात्र पृष्ठ संख्या कमी करून शिक्षणवेधचे पुढील अंक प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला आहे. आपले असेच सहकार्य लाभेल असा विश्वास वाटतो.



संपादकीय

# नवे शिक्षण नव्या दिशा...

आजही महाराष्ट्रात काही शासकीय आणि बहुतेक खासगी मराठी (इंग्रजी) शाळा, पारंपरिक वर्तनवादी विचारसरणीवर श्रद्धा ठेवून चालल्या आहेत. आपले माध्यमिक शिक्षण तर सारेच पारंपरिक पद्धतीने विद्यार्थ्यांचे मर्यादित, बंदिस्त असे शिक्षण आचरित आहे. शिक्षणविषयक वैचारिक क्षेत्रात तरी अशा प्रकारच्या वर्तनवादी शिक्षणाला बहुतांशी फाटा दिला आहे. वर्तनवादी विचारसरणीबाबतची वैचारिक घसरण सुरू होऊन सुमारे पासष्ट वर्षे होत आली. हा कालावधी खूप मोठा आहे. तरीही आपण त्याच जुन्या नी मागास पद्धतीला घट्ट चिकटून राहिलो आहोत. याची कारणे कदाचित अनेक असतील; उदा. विद्यार्थी सोडून, शिक्षणाशी संबंधित सर्वच घटकांना ही, काही बदल न करता, वर्षानुवर्षे कामाची सोयीस्कर पद्धत असावी. अशी आणखीही काहीही कारणे असू शकतील. परंतु मला जाणवलेले एक महत्त्वाचे कारण असे आहे की, शिक्षणाला पायाभूत असणाऱ्या विविध शास्त्रांतील संशोधनांतून, सिद्ध अशी एक नवीन शिक्षणपद्धती आकाराला आली आहेत, याबद्दल, या देशांतील, या महाराष्ट्र राज्यातील बहुसंख्य लोक अनभिज्ञ आहेत. आणि ज्ञानाच्या क्षेत्रातील ही 'अज्ञाना'ची परिस्थिती जाणवून, 'तिमिरातून ज्योतीकडे जाण्याची ईर्षा आपणच बाळगली पाहिजे असे वाटले. मग अभ्यास, प्रयोग, प्रशिक्षणे,

भाषणे, लेखन प्रकाराने या विविध अंगांनी, रचनावादी शिक्षणाचा प्रसार-प्रचार सुरू झाला.

आमची 'ग्राममंगल' ही संस्था या कार्यात हिरीरीने उतरली. अनुभवांनी, या दिशेने अनेक कार्यक्रम तत्परतेने तयार झाले.

जागतिक पातळीवर शिक्षणाच्या क्षेत्रातील परिवर्तनाचा थोडक्यात आशय असा आहे:

१९५० च्या दशकात एकीकडे वर्तनवादी विचारसरणी उच्चस्थानी असतानाच, तिची वैचारिक घसरण होऊ लागली. तिच्यावर शिकण्या-शिकविण्याची एक असमाधानकारक पद्धती म्हणून शिक्का बसू लागला.

१९५० च्या दशकापासून पियाजे, वायगोटस्की, ब्रुनर हे मानसशास्त्रज्ञ आणि चॉम्स्कीसारखे भाषाशास्त्रज्ञ यांच्या नवविचारांतून वर्तनवादी विचारसरणीची जागा हळूहळू आकलनवादी विचारसरणी घेऊ लागली. १९७० च्या दशकापासून, मेंदूविषयक संशोधन पुढे येऊ लागले. शिकणे म्हणजे काय आणि शिकण्याची नैसर्गिक प्रक्रिया काय यांवर प्रकाश पडू लागला. १९८० च्या दशकापासून लेस्ली हार्ट यांचा 'मेंदूआधारित शिक्षणपद्धती'चा विचार पुढे सरसावला. त्याचवेळी गार्डनर यांचा बहुविध बुद्धिमत्तांचा नवा विचार, शिक्षणक्षेत्र ढवळून काढू लागला.

१९९० च्या दशकापासून 'मेंदूपूरक शिक्षण' म्हणजे काय आणि 'मेंदूघातक शिक्षण' म्हणजे काय, याची अधिक स्पष्ट कल्पना, शिक्षणक्षेत्रातील मंडळींना येऊ लागली.

२००० सालापासून या सर्व आधीच्या संशोधन क्षेत्रांमधून 'ज्ञानरचनावादी' शिक्षणप्रणालीचा उदय व विस्तार, प्रयोग व प्रसार वेगाने होऊ लागला. या शिक्षणप्रणालीने आधीच्या शिक्षणप्रणालीची जागा घेतली व या पद्धतीने शिकणारी सर्वच मुले आनंदाने प्रभावीपणे नी सहजपणे शिकू शकतात हे लक्षात येऊ लागले.

इथे मी शिक्षणविचारांतील पायाभूत परिवर्तनाचा स्थूल आढावा दिला आहे.

शैक्षणिक विचारांचे दैनंदिन आचारांत रूपांतर करण्याचे काम हे प्रत्यक्षात शिक्षणाधिकारी व स्वत: शिक्षकांचे आहे. त्यामुळे या वर्गांना हे शास्त्रीय विचार आत्मसात करण्याची असलेली गरज ओळखून, त्यांच्यासाठी 'रचनावादी शिक्षण' या विषयावर पूर्ण एकवीस दिवसांचा अभ्यासक्रम नऊ महिन्यांत विभागून पुण्यात घेण्यात आला. त्या वर्गातील लोकांनी, रचनावादाच्या आपापल्या जाणिवा, कोणत्याही पूर्वतयारीशिवाय, मांडण्याचा केलेला प्रयत्न इथे वाचकांपुढे ठेवीत आहोत. तो इतरांना मनोरंजक, उद्बोधक आणि उपयुक्त वाटेल अशी खात्री आहे!

**-रमेश पानसे**

संपादक

# मला उमगलेला
# रचनावाद

**प्रा. रमेश पानसे यांनी 'रचनावादी शिक्षण' यार विषयावर २० दिवसांचा वर्ग घेतला. त्यामागील भूमिका त्यांनी संपादकीयमधून मांडली आहेच. त्या वर्गाला उपस्थित असलेल्या व रचनावादी पद्धतीने शिक्षण घेतलेल्या मान्यवरांनी या वर्गाचे लिहिलेले अनुभव.**



मी रचनावाद अभ्यास वर्गात शिकलो आणि आता तासाभरात मला त्याचा अनुभव लिहायचा आहे. मी तसा शिक्षणक्षेत्राशी संबंध नसलेला माणूस. माझे कार्यक्षेत्र होते/आहे 'मोठ्यांनी मुलांशी कसे वागावे, जेणेकरून त्यांचा सर्वांगीण विकास छान होईल, यावर भाष्य करणे.' हे करत असताना मी जे काही शास्त्रीय आधार घेतले; ज्यात पियाजे, स्किनर, पावलो यांसारख्या शास्त्रज्ञांच्या कामाशी संबंध आला. या सगळ्यांचे अभ्यासक पानसे सर यांच्याशी बोलताना जाणीव झाली की, वरवर साधा दिसणारे पानसे सर पण त्यांच्या ज्ञानाची, यांच्या अभ्यासाची खोली आपल्या लक्षातच येत नाही. जेवढी चर्चा करावी, तेवढा तळ अजून खोल आहे याची जाणीव होत गेली आणि यातूनच त्यांचा हा १२ महिन्यांचा वर्ग करण्याची इच्छा झाली. त्यांनी आधीच सांगितले, ''माझ्याजवळ जे आहे, ते मला आता वाटून द्यायचे आहे आणि तुम्ही ते घेऊन

पुढे पसरवा.'' मग काय मनात म्हटले, 'घे लुटून घे दिनेश!' आणि हा अभ्यासवर्ग सुरू केला. माझ्या कामाच्या बाहेर खूप जास्त ज्ञान आहे याची जाणीव झाली आणि ते भरून घ्यायला सुरुवात केली.

अगदी पहिल्या अभ्यासवर्गात रचनावाद समजला तो, 'मेंदू-आधारित शास्त्रीय शिक्षण' म्हणजे जसजशा मेंदूच्या क्षमता वाढत जातात, तसतसे शिक्षण त्या-त्या क्षमतांशी जोडत जाऊ देणे. त्यानंतर एक तास झाला- ज्यात भावनिकता व शिक्षण मेंदूच्या तीन सिद्धांतांवरून शिकलो आणि एक मुद्दा प्रकर्षाने समोर आला. तो म्हणजे, भावनिक सुरक्षिततेच्या अभावात शिक्षण होऊच शकत नाही. 'ॲमिग्डला'- हा मेंदूमधील भाग जो भावना निर्माण करतो, तो शिक्षणाचा द्वारपाल म्हणून काम करतो. कारण भावना- विशेषत: भीतीची भावना निर्माण झाल्यास ॲमिग्डला कुठलीही माहिती ही वरच्या मेंदूकडे म्हणजेच neocortex कडे जाऊच देत नाही, जिथे माहितीचे खरे रूपांतर ज्ञानात होत असते.

त्यानंतर शिकलो रचनावादाचे पाच सिद्धांत. त्यातील सगळ्यात महत्त्वाचे -

* मूल आपले आपण शिकते.
* मूल कुठलाही नवा अनुभव हा आपल्या पूर्व-ज्ञानाशी जोडून शिकते.
* कुठल्याही अनुभवाची मुलाच्या मेंदूत एक मानस प्रतिमा तयार होते व त्या प्रतिमांची पेशी-जालिकेत मांडणी केली जाते.
* ज्ञान हे माहितीवर प्रक्रिया करून निर्माण होते.
* प्रत्येकाचे ज्ञान हे त्याचे व्यक्तिगत ज्ञान असते.

रचनावाद हा तीन स्तरांवर मांडता येतो-

१) तत्त्वज्ञान,

२) विचारप्रणाली,

३) शिक्षणपद्धती.

तत्त्वज्ञानाच्या पातळीवर काही मुख्य सिद्धांत आहेत ते म्हणजे-मूल आपले आपण शिकते आणि मूल आपल्या पूर्वज्ञानाला नवे अनुभव जोडून नवी ज्ञाननिर्मिती करते.

पियाजे या विचारवंताने यापुढे जाऊन मानसपातळीवर शिक्षण कसे होते, याची विचारप्रणाली मांडली. म्हणजेच, प्रत्येक अनुभवाची एक मानस प्रतिमा निर्माण होते. प्रत्येक नवा अनुभव एक तर या प्रतिमेचा विस्तार करतो. (Assimilation) किंवा नवीन प्रतिमा (accomodation) निर्माण करतो. या पद्धतीने सगळे शिक्षण सुरू असते. त्यामुळे मुलांना अनुभवाधारित शिक्षण दिल्यास ती लवकर आणि आनंदाने शिकतात.

शिक्षणपद्धतीच्या पातळीवर रचनावादाचा विचार केल्यास या शिक्षणपद्धतीत मुलांना वास्तव जीवनातील अनुभव देणे आवश्यक असते. अनुभव हे आव्हानात्मक पद्धतीचे असावेत. म्हणजेच, त्यांच्या पूर्वज्ञानाच्या संबंधातून त्यांना छोटी-छोटी आव्हाने देणारे असावेत.

रचनावादाच्या इतिहासाचा विचार करता असे लक्षात येते की, हा जवळजवळ ६० वर्षांचा

इतिहास आहे आणि आकलनशास्त्राचा शोध लागल्यामुळे याचा उगम झाला. माणसाला आकलन कसे होते, या विचारातून झाला. यासाठी वेगवेगळ्या सहा शास्त्रांची मदत घेऊन या प्रत्येक शास्त्रात आकलन होण्यासाठी काय घडते याचा अभ्यास करण्यात आला. तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, मज्जाशास्त्र, मानववंशशास्त्र, भाषाशास्त्र व संगणकशास्त्र या प्रत्येक शास्त्रातून ६ विविध तत्त्वे बाहेर आली. त्यातून आकलनशास्त्राचा जन्म झाला आणि गेल्या ५० वर्षांत वर्तनवादाची घसरण होत गेली. वर्तनवादातील दुष्परिणामांची जाणीव हळूहळू होत गेली आणि त्यातूनच रचनावादाला उभारी येत गेली व आजच्या रचनावादाची निर्मिती होत गेली.

आज महाराष्ट्रात रचनावादाची अंमल-बजावणीची जी चळवळ सुरू झाली, ती उल्लेखनीय आहे आणि मनाला उभारी देणारी आहे.

**- दिनेश नेहेते**

'रचनावाद' या शब्दांतील 'रचना' या शब्दाचा अर्थ मला कलांशी जोडावासा वाटतो. वास्तुकला, चित्रकला, कविता, कथा इ. 'रचना' हा शब्द किती सुंदर आहे. कलाकाराच्या मनात एखाद्या आशयाचे बीज पडते, तयार होते आणि त्यातून एखाद्या कलाकृतीची रचना तयार होते. कल्पना निर्माण होते मनात व हळूहळू क्रमाने ती कल्पना साकारू लागते. त्या टप्प्यांमध्ये किंवा क्रमामध्ये रेखीव सुसूत्रता असते. त्याची एकजीव आणि घट्ट बांधणी असते. त्यातून सुंदर रचना तयार होते- कायम चिरंजीव असणारी.

कोणताही घटक शिकताना, समजून घेताना असेच घडायला हवे -

* काय शिकावे हे समजावे.
* क्रमाक्रमाने ती संकल्पना तयार व्हावी.
* संकल्पनेचे टप्पे एकमेकांमधून जन्माला आल्यासारखे सुसूत्रपणे बांधलेले असावेत.
* स्मृतिकोशात ती संकल्पना कायमस्वरूपी टिकावी.
* संकल्पना किंवा आशय उमजला म्हणून तो सहजसुंदर आहे, हे जाणवावे.
* त्याचा हवा तेव्हा सहज उपयोग करता यावा.

'असे शिकणे' कसे घडावे? तर--

❍ माहिती मिळवण्याचे, संकल्पना उमजण्याचे स्रोत आजूबाजूला असावेत. जसे- पुस्तके, साधने, इंटरनेट, मोबाईल, शिक्षक इ.

❍ मुलांनी काय माहिती मिळवावी, हे स्वत:लाच ठरवता यावे किंवा शिक्षकाला जी माहिती मुलांपर्यंत जावी असे वाटते, त्या माहितीविषयीची उत्सुकता मुलांच्या मनात निर्माण होईल, असा रचनेचा पहिला टप्पा शिक्षकाने तयार करावा.



❍ मुलांची उत्सुकता केव्हा वाढेल? तर, एक- ते त्याच्या पूर्वानुभवात आहे. दोन- त्या माहितीबाबत उत्सुकता वाटते आहे. आणि तीन- ती माहिती माझ्या उपयुक्ततेची आहे, हे लक्षात येईल. असे वातावरण असावे किंवा



विषय-सुरुवात करताना शिक्षकाने ती कल्पकतेने करावी.

❍ संकल्पनेच्या प्रत्येक टप्प्यावर कृती किंवा अनुभव असायला हवा. कृती अनेक प्रकारच्या असू शकतील. मुलांच्या वयोमानानुसार, त्यांच्या क्षमतेनुसार, आजूबाजूला असलेल्या सामाजिक संदर्भानुसार कृतीचा प्रकार आणि कृतीची काठीण्यपातळी वाढवता येईल.

कृती करताना आंतरक्रिया घडत जावी. मुला-मुलांमध्ये, मूल आणि शिक्षक किंवा मुले आणि शिक्षक, मूल आणि परिसर तसेच मूल व त्याने निवडलेले साधन यांतही आंतरक्रिया घडावी. म्हणजे मूल साधनाचा वापर क्रमाने करत गेले, तर त्याला उमजत तरी जाईल. त्याला काही प्रश्न पडले तर प्रत्येक प्रश्नांच्या टप्प्यावर त्याला इतरांचे सहकार्य होईल.

प्राथमिक पर्यंतच्या टप्प्यावर ठोस वस्तू, चित्रे, अनुभव, गप्पा या साऱ्या कृती त्याला शिकताना उपयुक्त ठरतील.

माध्यमिकच्या टप्प्यावर मुलांना भाषिक, वैचारिक कल्पनानिर्मितीच्या पातळीवरील कृती करायच्या आहेत. अशा वेळेस त्याच्या आंतरक्रिया करण्याच्या क्षमताही विकसित होतील आणि त्या आंतरक्रियांची व्याप्ती व सखोलता वाढेल. एकमेकांच्या सहकार्याने अधिकाधिक व्यापक व खोलवरचा शोध घेतला जाईल. हा शोध घेण्यासाठी नवनवे स्रोत वापरले जातील. शोध घेतलेल्या माहितीची सुसूत्रपणे बांधणी केली जाईल. ही बांधणी करताना नोंद, क्रम, विश्लेषण, पर्याय, निष्कर्ष मांडणे, नवे पर्याय मांडणे अशा वैचारिक कृतींना गती मिळेल. स्वत:चा नवा विचार, कल्पना याची एखादी रचना साकार करण्याचीही संधी मिळेल.

विचारमांडणी करताना अभिव्यक्तीचे वेगळे, सुंदर मार्ग शोधले जातील. मुलांना कोणी बोट धरून शिकवावे ही गरज हळूहळू वाटता कामा नये; तर शिकावेसे वाटणे, शिकण्याचे मार्ग सापडणे, उद्दिष्टापर्यंत पोहोचणे हे सहज घडायला हवे. म्हणजेच शिकावे- कसे हेच मुलांना उमजावे. ज्ञान मिळवण्याची सारी साधने त्याच्या हातात यावीत. हा आहे ‘रचनावाद’.

**– सुषमा पाध्ये**

मे-जून २०१३ मध्ये इयत्ता पहिली व दुसरीच्या पुनर्रचित अभ्यासक्रमाच्या जिल्हास्तरीय प्रशिक्षणासाठी मला पाठवले गेले. यामध्ये SCERT ने तयार केलेली मार्गदर्शिका, शिक्षक हस्तपुस्तिका अन् पाठ्यपुस्तके मला मिळाली. मी ती संपूर्णपणे वाचली. त्यामध्ये मला मिळालेला शब्द होता नवा ‘ज्ञानरचनावाद’. मला माहिती नव्हतं की, याला इतकं महत्त्व प्राप्त होणार आहे. पण नवा वाटला अन् आवडला हा शब्द ‘ज्ञानरचनावाद’.

ही माझी रचनावादाशी पहिली गाठभेट. त्यानंतर एप्रिल २०१४ मध्ये सातारा येथे कार्यप्रेरणा सत्रासाठी गेले. तिथे प्रतिभाताई भराडे यांनी कुमठे बीट तालुक्यामध्ये संपूर्ण अध्ययनासाठी रचनावाद प्रत्यक्षात कसा वापरला आहे अन् त्याचे परिणाम काय होत आहेत, हे मी पाहिले.

आता मात्र उत्सुकता निर्माण झाली. मग रचनावादाविषयी जास्तीत जास्त माहिती मिळवून वाचायला सुरुवात केली. आधी वाईच्या शाळेविषयी, मग ग्राममंगलविषयी वाचलं. त्यानंतर 'रचनावादी शिक्षण' हे रमेश पानसे यांचे पुस्तक हातात आलं. सुरुवातीला समजणं अवघडच गेलं. मात्र वाचायचंच, असं ठरवून वाचलं. मग खूप आश्चर्य वाटलं, संभ्रम निर्माण होऊ लागले. वाचलेलं व्यवहारात कसं आणावं, हे कळत नव्हतं. तेव्हा पुन्हा एकदा सातारा वारी करायचं ठरवलं. या वेळी वाचनाचं थोडसं 'पूर्वज्ञान' होतं. त्यामुळे साताऱ्यातील शाळांची माहिती सजगपणे/डोळसपणे घेतली. पुन्हा आपल्या तत्त्वांनुसार पूर्वज्ञान- घेतलेली माहिती यांची आंतरक्रिया होऊन माझी स्वत:ची 'मला थोडंसं कळतंय' अशी खात्री होऊ लागली.

मग मला 'कर्ता-करविता' वाच, असं सांगितलं गेलं. आधी तर ते कळतच नव्हतं. मात्र हळूहळू हे सगळं वाचायला आवडत गेलं. समजून घ्यावंसं वाटलं. मग हे अभ्यासवर्ग सुरू झाले.

आधी केवळ 'रमेश पानसे' सर कसे आहेत, कसे असतील, कसं हे सगळं उलगडून सांगतील- या उत्सुकतेने वर्गाला आले. मग कळलं, एवढं अवघड लेखन करणारा हा अजब माणूस हे सगळं सोप्पं करूनही सांगू शकतो, मग हायसं वाटलं.

आता खरा, शेवटचा अन् महत्त्वाचा मुद्दा- माझ्यासाठी रचनावाद काय आहे? काय वाटतोय?

-'प्रत्येक कृती/संकल्पना करून बघा, तर ती समजेल.

- आधी आपल्याला अमुक एका संकल्पनेविषयी/घटकाविषयी काय वाटत होतं (समज) - त्याविषयी विविध अनुभव (प्रक्रिया) घेतल्यानंतर - त्याविषयी आपला दृष्टिकोन आता कसा आहे? (परिणाम). असा विचार करणे हे रचनावादात घडते.

-पूर्वज्ञान - माहितीप्रक्रिया-नवी ज्ञाननिर्मिती

मग या 'माहितीप्रक्रियेत' प्रचंड विलक्षण गोष्टींचा समावेश होतो. (जनुकं, मनुकं, अभ्यासक्रम, विविध माध्यमं, संगणक, घटना इ. इ.)

शेवटी काय- शिक्षणाची ध्येये काय असावीत याविषयी रचनावादाने मला दिलेला दृष्टिकोन-

१) मुलाच्या 'स्व'चा विकास करणे २) शिकण्यातला आनंद मिळवून देणे.

रचनावादाची वर्गातील व्यावहारिक बाजू अशी असावी -

* शिक्षकाने आधी मूल समजून घ्यावे.

* मुलांच्या पूर्वज्ञानाचा अन् आपल्या अभ्यासक्रमाचा मेळ घालून योग्य असे अध्ययन अनुभव वर्गात द्यावेत.

* मुलांच्या विचारप्रक्रियेला चालना द्यावी.

* वर्गात मुक्त वातावरण निर्माण करावे.

* मुलांना काय आवडते, अशी गोष्टी वर्गात असाव्यात.

* वैयक्तिक व सामूहिक आंतरक्रियांना संधी द्यावी.

अशी रचनावाद समजण्याची उमजण्याची प्रक्रिया अजूनही चालूच आहे.

**-कल्पना पादकोंडे**



NCF 2005 व SCF 2010 मधून आलेला हा ‘रचनावाद’ मला प्रथमत: इयत्ता दुसरीच्या राज्य प्रशिक्षणात ऐकावयास मिळाला. तत्पूर्वी एम. एड. करत असताना ‘रचनावादा’ची धूसर कल्पना होती. त्यात सामाजिक रचनावाद व शैक्षणिक रचनावाद याविषयी थोडक्यात माहिती मिळविली होती. पण शिक्षण हक्क कायदा, २००१ मधील जो बदल झाला, त्यामुळे रचनावाद जाणून घेणे ही काळाची गरज वाटू लागली. यासाठी विविध प्रशिक्षणांतूनही ‘रचनावाद’ जाणून घेतला. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पानसे सरांच्या वर्गातून तो मला मिळाला.

विद्यार्थी पूर्वानुभवाद्वारे आपले ज्ञान नव्या संकल्पनेशी कसे जोडतो, हा प्रश्न मला सतत भेडसावत असे. त्यात कृतीतून शिक्षण आपण शिकवावयाचे नाही, तर एक सुलभक म्हणून काम करावयाचे. या बाबी भेडसावत असतानाच आपण एक प्रयोग करून पाहावा, म्हणून इयत्ता चौथीतील भूगोल विषयाचा ‘नकाशा भरणा’ ही संकल्पना/ अनुभव विद्यार्थ्यांना द्यावयाचा होता. विषय होता ‘प्रशासकीय विभाग’. यासाठी महाराष्ट्राचा नकाशा (प्रशासकीय विभाग) असणे गरजेचे वाटले. तो नकाशा प्राप्त करून घेतला.

प्रत्यक्ष रचनावाद पद्धतीने शिकविणे गरजेचे होते. वर्तनवादी विचार मात्र चूप बसू देत नव्हते. निर्धार केला- त्यासाठी आपण आता ‘सुलभक’ म्हणूनच काम करायचे ठरविले.

यासाठी अध्ययन अनुभवांची जुळवाजुळव केली.

१) नकाशावाचन २) निरीक्षण करणे ३) नकाशा भरणे ४) महाराष्ट्र नकाशे - कोरे

नकाशावाचनासाठी प्रश्न तयार करण्यात आले. विद्यार्थ्यांनी नकाशाचे निरीक्षण करून उत्तरे स्वत:हून दिली. नकाशाभरणा केला. या वेळी मात्र मला त्यांचे निरीक्षण करावे लागले. मुले कृती करत होती. सर्व मुलांनी तो नकाशा बिनचूक भरला. नकाशावाचन केले.

या बाबतीत विद्यार्थ्यांच्या अनेक आंतरक्रिया पाहावयास मिळाल्या. विद्यार्थी स्वयंप्रेरणेने शिकत होते. स्वत: पडताळा घेत होते. स्वत:च्या गतीने शिकत होते. भीतीमुक्त वातावरणामुळे चर्चेत सहभागी होऊन अनुभव घेत होते. विद्यार्थी-विद्यार्थी, विद्यार्थी-शिक्षक आंतरक्रिया घडून येत होत्या. त्यामुळे त्यांच्या विचारप्रक्रियेला चालना मिळत होती. घोकंपट्टी करण्याचा प्रश्न उरलेला नव्हता.

मुलांच्या चेहऱ्यावरील हावभाव पाहून मलाही खूप-खूप आनंद झाला.

रचनावादीपद्धतीने शिक्षण झाले, तर मुलांची शाळेविषयीची अनास्था दूर होईल. मुले अध्ययन चांगल्या प्रकारे करतील. शाळेत रमतील व टिकतील, अशी आशा बाळगतो.

**-सुभाष चव्हाण**

रचनावादी अभ्यासवर्ग करत असताना मला रचनावाद म्हणजे असे लक्षात आले : टप्प्या-टप्प्याने शिकणे, म्हणजे रचनावाद होय.

मी करत असलेल्या वर्गावलोकन व देत असलेल्या शिक्षक प्रशिक्षणातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. ती म्हणजे, भाषा किंवा गणितातील संकल्पना स्पष्ट करत असताना (शिकताना) साधन साहित्य असणे अत्यंत गरजेचे आहे (आवश्यकतेनुसार).

'कुठल्याही विषयातील संकल्पना ही टप्प्या-टप्प्याने साधनाद्वारे शिकणे म्हणजे रचनावाद.'

मला असे वाटते की, रचनावाद हा मुलाला शिकवणे किंवा मुलाने शिकणे एवढा मर्यादित नसून शिक्षक-प्रशिक्षक प्रशिक्षणातसुद्धा रचनावाद असणे गरजेचे आहे. ज्या पद्धतीने प्रशिक्षण दिले जाते, त्या पद्धतीने शिक्षक वर्गात जाऊन काम करतात. म्हणजे मी जर का प्रशिक्षणात साधनसाहित्य न वापरता शिक्षकांना प्रशिक्षण दिले, तर ते त्याच पद्धतीने वर्गात काम करतील.

वर्ग-अवलोकनात आलेले काही अनुभव इथे द्यावेसे वाटत आहेत.

इयत्ता तिसरीची वर्गशिक्षिका वह्यांचे वाटप करत होती. म्हणून मागच्या बेंचवरच्या मुलीजवळ जाऊन बसले. तिला विचारले, 'तू काय करत आहेस?' बाजूची मुलगी म्हणाली, 'तिला काही येत नाही.' म्हणून त्या मुलीला तिचे नाव लिहायला लावले. तिला संपूर्ण नाव लिहिता आले. नंतर मी एकेक अक्षर लिहीत गेले. मुलगी अक्षरे वाचत होती. जे अक्षर तिला वाचता आले नाही, त्याभोवती गोल करत होते. येणाऱ्या व न येणाऱ्या अक्षरांचे वर्गीकरण केले. येणाऱ्या अक्षरातून मी एक शब्द तयार केला. जसे : कप. तिला शब्द तयार करायला सांगितले. थर, कर इत्यादी शब्द तयार केले. स्वरचिन्ह लावून अक्षर-वाचन येत नव्हते. म्हणून तिला 'का', 'मा' अशी दोन अक्षरे वाचायला शिकवले. ध्वनी कळाला. त्यामुळे पुढील अक्षरे तिने योग्य रीतीने वाचली. 'आकारा'चे शब्द वाचायला दिले. सर्व शब्द छान वाचता आले. हे करत असताना मुलीच्या चेहऱ्यावर आनंद, आवड आणि आत्मविश्वास दिसत होता. नंतर शिक्षिकेला काम कसे करून घ्यायचे, ते समजून दिले. तिच्या क्षमतेच्या इतर मुलींना मी आणि शिक्षिका घेऊन बसलो. मुलींना अक्षर व शब्दांचे श्रुतलेखन दिले. त्यामुळे प्रत्येक मुलीची क्षमता कळाली. मी शिक्षकाला भाषा, गणितातील क्षमता/संकल्पना स्पष्ट करण्याच्या पायऱ्यांची यादीच देते. उदा. शतकाची ओळख (इ. तिसरीसाठी) १) काड्या गठ्ठ्यातून २) शतक, दशक, एकक कार्ड वापरून ३) नोटा वापरून (बेरीज-वजाबाकी करताना सोपे जाते).

अक्षर-ओळख : ध्वनी खेळ, अक्षराला गोल करणे, बिया लावणे, हवेत अक्षर काढणे, अक्षर गिरवणे, प्रत्यक्ष लेखन. शिक्षिकेला सांगितले, आता यांना यापुढील पायरी शिकवायची तयारी करून घ्यायची. शिक्षिकेला भाषा व गणितातील कोणत्या क्षमता सप्टेंबर अखेरपर्यंत येणे अपेक्षित आहे, त्याची यादी दिली.

मला वाटते, यालाच आपण रचनावाद म्हणतो. शिक्षिकेला मुलांच्या क्षमता कशा ओळखायच्या असतात, हे समजणे पण गरजेचे आहे. या कशा ओळखायच्या, हे प्रात्यक्षिकाद्वारे समजून देणे, हे एका प्रशिक्षकाचे काम आहे. अर्थात ज्याला रचनावाद माहीत आहे, त्याला हे सहज करता येईल.





एखाद्या मुलाच्या एखाद्या कृतीचा अर्थ समजून घेऊन मुलांची संकल्पना स्पष्ट करणे म्हणजे रचनावाद. मुलांच्या कृतीचा अर्थ समजावून घेणे, त्यांना योग्य ते सहकार्य करणे, त्यांना क्रमाने सोपे ते कठीण उपक्रम देणे, अनुभवातून अर्थ समजू देणे म्हणजेच रचनावाद होय.

**- संजीवनी साकळकर**

प्रा. रमेश पानसेसरांकडून अभ्यासवर्गात रचनात्मक शिक्षणपद्धती सखोलपणे आत्मसात करू पाहतो आहे. पूर्वीच्या वर्तनवादी पद्धतीने माझे सहकारी अध्यापन करत होते. वर्ग १००% प्रगत करण्यासाठी रचनावादी शिक्षणपद्धती आत्मसात करण्याची गरज निर्माण झाली. या अभ्यासवर्गातून मला उमगलेला रचनावाद हा पुढीलप्रमाणे आहे.

१) रचनावाद ही नैसर्गिक शिक्षणपद्धती आहे. वर्तनवाद ही कृत्रिम वाटते. कारण त्या पद्धतीने आपण दैनंदिन अत्यावश्यक बाबी शिकत नाही.

२) ८६ वा घटनादुरुस्तीने शिक्षण हे मूलभूत हक्क बनल्याने ते जीविताच्या हक्काइतकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे आपण ज्याप्रमाणे इतर बाबी शिकतो, त्याच पद्धतीने शिक्षण होणे आवश्यक आहे.

३) रचनावादात आपण मूल समजून घेतो, त्याच्या मताचा आदर करतो, पूर्वज्ञान जागृत करतो व नव्या माहितीशी प्रक्रिया करूनच मूल नवी ज्ञाननिर्मिती करते.

४) शिक्षणाच्या उद्दिष्टांनुसार आपणा विविध कृतींची/ शैक्षणिक अनुभवांची आखणी करणे रचनावादात अपेक्षित आहे.

५) वर्तनवादात आपण माहिती देणे करतो, पण ज्ञान आकलन होण्याकडे लक्ष देत नाही. रचनावादात आपण ज्ञान, आकलन, उपयोजन, कौशल्य, अभिव्यक्ती, अभिरुचीपर्यंत सहज जाऊ शकतो.

६) रचनावाद मुलांना आत्मविश्वास, आनंद देतो आणि त्यांचा 'स्व'चा विकास होण्यास नक्की मदत होते.

७) घोकंपट्टीमुळे प्रतिमानिर्मिती होत नाही, त्यामुळे मुलांना विस्मरण होते. ही बाब रचनावादाचे महत्त्व विशद करते.

८) रचनावादात प्रत्येक मूल स्वत:चे स्वत: शिकते.

९) रचनावादात भोवतालच्या समाजाच्या मदतीने अनुभव घेऊन आपापल्या गतीने शिकता येते.

१०) शिक्षकांनी शिकवलं तरच मूल शिकेल, ही संकल्पना आता कालबाह्य झाली.

११) मानसप्रतिमा बदलणे, संकोचणे, विस्तारणे म्हणजेच शिकणे- हे समजले.

**- तात्यासाहेब माळी**

## मला उमगलेला रचनावाद

'करके देखो' म्हणायला छान वाटते; परंतु प्रत्यक्ष करायची वेळ आली, तर ती 'कृती' करायला आळशी मन तयार होत नाही. हेच आपल्या वर्गाध्यापनातही होत आहे.

मला रचनावाद समजण्यासाठी या विषयावरील पुस्तके, अभ्यासवर्ग, लेख,व्हॉट्स ॲप यांचा उपयोग होत आहे. हा विषय पूर्णपणे उमगणे तसे अवघडच, परंतु हा प्रवास सुरू झाला आहे. अभ्यासकांच्या माध्यमातून हा प्रवास पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे.

रचनावादात खालील घटकांना अतिशय महत्त्व आहे.

१) **पूर्वज्ञान :** प्रत्येक बालकाकडे सर्वच विषयांचे काही तरी पूर्वज्ञान असतेच. बालकांना अनुभवांची विविधता जेवढी जास्त तेवढा पूर्वानुभव प्रगल्भ असतो. पूर्वानुभवात परिस्थितीनुसार काही बदल होत जातो, कारण बालक ज्या परिसरात राहतो त्याप्रमाणे त्याचे अनुभव तयार होतात. ग्रामीण परिसरात ग्रामीण पूर्वानुभव तयार होतात. तसेच शहरी भागात. या क्षणाला मिळवत असलेले ज्ञान हे पुढील क्षणाला पूर्वानुभव होते. पूर्वानुभव प्रगल्भ असल्यास ज्ञानाची नवनिर्मिती सहज होते.

२) **नवनिर्मिती :** शिक्षक विद्यार्थ्यांना जी माहिती देतात, त्याची विद्यार्थी पूर्वज्ञानाशी सांगड घालून नवी ज्ञाननिर्मिती करतात. माहितीचे रूपांतर ज्ञानात करणे, ही अतिशय महत्त्वपूर्ण बाब आहे.

३) कृतियुक्त अनुभव ४) नावीन्यपूर्ण वर्गरचना ५) शैक्षणिक साधनांचा प्रभावी वापर.

६) **रचनावादाचा प्रवास : वर्तनवाद → आकलनवाद → रचनावाद** असा रचनावादाचा प्रवास झाला आहे. सन १९५० च्या दशकातील आकलनवादाचे व्यापक रूप म्हणजे रचनावाद आहे. वर्तनवादाने भारतीय शिक्षणपद्धती ही सेवक निर्माण करीत आली आहे. येणाऱ्या काळात रचनावाद विद्यार्थ्यांमधून नेतृत्व निर्माण करू शकेल.

७) **रचनावाद व मेंदू संशोधन :** मेंदू संशोधनामुळे रचनावाद वाढीस चालना मिळत आहे. मेंदू हा मानवाचा शिकण्याचा अवयव व अनुभव हे त्याचे खाद्य. जेवढे चांगले व सकस खाद्य मिळेल, तेवढा सुदृढ मेंदू तयार होईल.

८) वर्तनवादात अध्यापनाला महत्त्व होते, तर रचनावादात अध्ययनाला महत्त्व आहे. यात केंद्रस्थानी बालक आहे.

९) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन याची२०१० या वर्षी अंमलबजावणी सुरू झाली, परंतु त्यावर प्रत्यक्ष कार्यवाही रचनावादात आहे.

**- संजय ससाणे**

मला आठवतंय- लहानपणी घरात आम्ही १८/२० माणसे राहत होतो. घरातली मोठी माणसे सतत कामात असायची. कामं म्हणजे काय तर- शेण-गोठा करणे, झाडणं, फर्निचर बनवणं, घराची डागडुजी करणं, धान्य वाळवणं, विहिरीचं पाणी काढणं वगैरे वगैरे.

आम्ही मुलं घरात भयंकर धुडगूस घालायचो. कोणीही आम्हाला ओरडायचं नाही. मनाला येईल ते करायचं पूर्ण स्वातंत्र्य होतं.



एकदा मी लाकूड घेतलं, त्यावर करवत चालवून कापायला सुरुवात केली. हात कापला. पायाला लागलं, लाकडाचा भुसा डोळ्यांत गेला. तोंडातून वेदनेचे चीत्कार बाहेर पडतच होते. हे सर्व काका पाहत होता. तो म्हणाला, ‘‘कर, कर-



काही होत नाही! बघ किती छान लाकूड कापलेस!'' काकाच्या या उत्तेजनामुळे मी 'पडे छडे माल बढे' या हिशोबाने एक छोटा चौरंग बनवला.

असाच उन्हाळा सुरू होता. पाणी-पाणी असे प्रत्येकाचा घसा ओरडत होता. आईने भरून ठेवलेला पाण्याचा माठ रिकामा झाला होता. मी व माझी बहीण सरळ विहिरीवर गेलो आणि रहाटाने पाणी काढून प्यायलो. वय तेव्हा फक्त सहा-साडेसहा वर्षांचे होते.

असे विविध अनुभव आम्हाला घरातूनच भरपूर मिळत गेले आणि त्यातूनच शिकत गेलो. पुढे जेव्हा समाजात मिसळू लागलो, तेव्हा प्रथम खूप भीती वाटायची. हे करू नये, लोक काय म्हणतील? पण घरात एखाद्या मोठ्या माणसाजवळ बोललो की, या सर्व गोष्टींची भीती कमी व्हायची.

शिक्षण पूर्ण झाले आणि वेगवेगळे अनुभव मिळू लागले. विविध स्तरांतले लोक भेटू लागले आणि कळत-नकळत शिकणे पुन्हा सुरू झाले.

एकदा एका गावात अडकून पडायची वेळ आली. कोणी ओळखीचे, परिचित, नातलग नाहीत आणि घरी तर वेळेवर पोचायचे होते.

भीती मनात दाबून रस्त्यावर उभी राहिले व एका टेम्पोला- जो कुरियर सेवा देणारा होता, त्याला- हात केला. त्यानेही बाई म्हणून, रात्री काळोखात उभी आहे म्हणून गाडी थांबवली. भीत-भीत पण धीटपणाचा आव आवून'मला अमुक ठिकाणी पोचवता का?' अशी विचारणा केली. तोही बिचारा भला होता. 'हो' म्हणाला. गाडीत वर चढले. तो म्हणाला, 'ताई' इकडे कोपऱ्यात बसा. म्हणजे जास्त सुरक्षित वाटेल.' ताई या शब्दानेच भीती कमी झाली. पण जीव मुठीत धरून, अंधारात अनोळखी रस्ता कापत गाडीत बसून राहिले आणि योग्य ठिकाणी पोचल्यावर हुश्श केले. नंतर प्रसंग आठवला तेव्हा- भीतीने तशीच बसले असते, तर काहीच साधता आले नसते; तेव्हा न भिता आल्या प्रसंगाला तोंड द्यायला शिकले पाहिजे, असे स्वत:ला समजावले आणि पुढेही तशी वागत राहिले.

एकदा एका चांगल्या गटामध्ये खूप काही शिकायला मिळण्याची संधी मिळाली. तिथे सतत भीती- आपल्याला काहीच येत नाही. आपण काही बोललो तर लोक हसतील, असा न्यूनगंड मनात होता. पण आमच्या गटाचा नियमच ठरला, प्रत्येकाने बोललेच पाहिजे. आता आली का पंचाईत! घाबरत-घाबरत हळूहळू बोलायला सुरुवात केली. आणि खरंच मनातला न्यूनगंड हळूहळू पण निश्चितपणे कमी झाला आणि विचारांची प्रगल्भता आली. आत्मविश्वास वाढला. मनातलं छान मांडता येऊ लागलं. यात गटामधील सहकाऱ्यांचाही मोठा सहभाग मिळाला. न समजलेले भाग, संकल्पना या अभ्यासातून समजणे सोपे गेले. परिणामी, दुसऱ्यांपर्यंत या अभ्यासातले मला नीट समजलेले भाग, घटक पोचवणे आवडू लागले आणि समोरच्यांना ते पटू लागले.

मनाला समजावू लागले- आपल्याला येते. पण प्रथम भीती काढून टाकून 'मला येईलच', हा विचार ठेवू लागले. आणि कधीही करू शकेन असे वाटलेही नव्हते, अशी कामे करायची संधी मिळाली. चांगल्या प्रकारे करू शकले.

शाळेत काम करताना मुलांना उत्तेजन देणे, हा मुख्य हेतू ठेवून, मनात ठसलेले विचार लक्षात

घेऊन वागणे सुरू केले. घरातही याच विचाराने वागू लागले आणि परिसरात येणाऱ्या व्यक्तींना माझ्यातील विधायक विचार आवडू लागला.

एके दिवशी मुलाच्या बाबतीत एक गंमत झाली. त्याने छान गणपती व दिवा बनवला. अवघा तीन-सव्वातीन वर्षांचा तो मुलगा. आणि काळ्या मातीत बनवलेला तो गणपती व दिवा अतिशय सुंदर वाटला. पुढे किती तरी दिवस तो विविध व्यक्तींना उत्साहाने दाखवत होता. आज १८/१९ वर्षांनंतर तो मुलगा भेटतो तेव्हा उत्तम शिल्पकार झाला असल्याचे दिसते. तेव्हा त्याला दिलेल्या प्रेरणेने एक शिल्पकार मिळाल्याचा आनंद होतो. अनुभवातून स्वतःचे ज्ञान स्वतः मिळवणे, पर्याय शोधणे, निर्मिती करणे हा 'रचनावाद' होय.

**-स्वाती गद्रे**

सुरुवात करायची झाली तर- जनुके (gens) व मनुके (menes) यांपासून बालकाला जनुकांपासून काही मिळालेले असते, तसेच काही मनुकांपासून. त्यासाठी त्याला ती गोष्ट करण्यासाठी वातावरणही तसे मिळणे आवश्यक असते.

मूल हे लहानपणापासून कृतीतून शिकत असते कृतीतून ते काही तरी नवीन शिकत जाते. त्यामध्ये काही तरी नवी रचना करते. त्याचप्रमाणे त्याच्या ज्ञानात भर पडत जाते. नवे शिकत असतानाच त्याच्या ज्ञानामध्ये भर पडत जाते व त्यातून पुनर्रचना होऊन ज्ञानाची नवनिर्मिती होत असते.

शिक्षक अथवा सहायक म्हणून काम करत असताना प्रथम मूल, 'आहे तसे' स्वीकारणे महत्त्वाचे असते. त्यासाठी त्याची वैशिष्ट्ये, तो कोणत्या समाजातून आला आहे, याचा विचार करून त्याला शिकण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे.

त्यामुळे वर्गातील शिक्षण हे तत्त्वाधारित असावे. त्यासाठी मुलांना स्वातंत्र्य द्यायला हवे, विविध साधनांमार्फत स्वनिर्मिती करण्यासाठी अनुकूल अशी वातावरणनिर्मिती करता आली पाहिजे. त्यांना माहिती असलेल्या ज्ञानाकडून त्यांना माहिती नसलेल्या ज्ञानापर्यंत सहज-सुलभरीत्या त्यांच्यापर्यंत आपण पोहोचवलं पाहिजे. यासाठी त्यांचे पूर्वज्ञान जोडावे, त्यामुळे मुलांना त्यांच्या जीवनाशी निगडित घटना माहिती असल्या की ते त्यांचा अर्थ लावू शकतात. विविध गोष्टी अनुभवातून शिकल्यामुळे प्रत्यक्षरीत्या शिक्षण होते व ते स्वतःहून शोध घेऊ शकतात. यामुळे व्यावहारिक ज्ञान व आकलन करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण होते. म्हणजे विविध तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, कृत्रिम बुद्धिमत्ता शास्त्र, मज्जासंस्थाशास्त्र या सर्व तत्त्वांचा वापर करून मुलाला शिकवल्यास मूल स्वतः शिकण्यास उत्सुक व आनंदी करण्याचा या शिक्षणपद्धतीचा इथे उगम व पुढे वापर झालेला आढळतो. यामुळे प्रत्येक गोष्ट हाताळल्यामुळे त्यांना ते सहजरीत्या समजते. म्हणून कृतिशील शिक्षण हे खूप महत्त्वाचे आहे.



पियाजेनुसार प्रत्येक मूल हे वेगळे असते, वयोगटानुसार त्याच्यामध्ये बदल होत जातो. यामुळे मुलाची शारीरिक व मानसिक स्थिती जर चांगली असेल, तर बौद्धिक रीत्या मुलांना शिक्षण देणे सोपे होते. यात मुलांचे शिक्षण हे स्वतःपासून व मग जग म्हणजेच समाजापर्यंत पोहोचते. म्हणून समाजात



आल्यावर वयोमानानुसार त्याचा संपर्क वाढत जातो व तो परस्परावलंबी होताना दिसतो. म्हणून शाळेत गटपद्धतीने मुलाला शिकण्यात खूप फायदा होतो, असे दिसून येते.

आत्ताची पिढी ही खूप प्रगत दिसून येते. त्यांना खूप काही तरी हवे असते व ते पुरवणे आपले कर्तव्य आहे. ते जाणून घेणेही महत्त्वाचे आहे.

मेंदूचा यामध्ये महत्त्वाचा वाटा आहे, असे समजते. आजूबाजूच्या वातावरणाशी जुळवून घेताना इतरांशी आंतरक्रिया होणे महत्त्वाचे असते. जर मूल वर्गात लक्ष देत नसेल अथवा त्याची मानसिक स्थिती नीट नसेल, तर ते जाणून घ्यायला हवे. मेंदूचा व मज्जासंस्थेचा परिणाम हा शरीरावर होत असतो. यामुळे त्यांच्या आकलनावर परिणाम झालेला दिसून येतो. यासाठी आपणास ते माहिती असणे महत्त्वाचे आहे.

ज्ञान कोठून येते, तर माहितीच्या आधारे ते प्राप्त होते. या माहिती आधारे प्रत्येक व्यक्तीला जे आकलन होते ते ज्ञान. पुनर्रचना करतेवेळी ज्ञानाचा संदर्भ लावून पुन्हा ज्ञानाची रचना होते.

**-अलंकृता अरोंदेकर**

कुसवडे शाळेची वर्ग तिसरीची विद्यार्थिनी प्रतीक्षा. प्रतीक्षेच्या गोष्टीने आम्हाला थक्क करून सोडले. तीन वेगवेगळे शब्द तीन वेगवेगळ्या शिक्षकांनी या चिमुकल्या प्रतीक्षेला दिले. यावरून गोष्ट तयार कर. एवढे वाक्य संपते न संपते तोच ती गोष्ट सांगायला लागली- तेही हावभावांसह, आरोह-अवरोहात. आम्ही प्रतीक्षाच करत होतो; पण प्रतीक्षेची गोष्ट संपेच ना, कुणी विचारही करणार नाही एवढी मोठी! या लेकराने १५ मि. कथा सांगितली. सोबत त्यामागील बोधसुद्धा सांगितला. मी शिक्षकांना विचारले, ‘हे कसे शक्य झाले?’ तेथील शिक्षकांनी उत्तर दिले, ‘ही किमया रचनावादाची!’

रचनावादातून काय बदल होऊ शकतो, हे त्या दिवशी प्रत्यक्षात अनुभवले. स्वत: वर्गात प्रयोग केले. या प्रयोगातून माझी हाती लागलेलं रचनावादाचं रहस्य मांडत आहे. रचनावादाची सुरुवातच मुळी आपल्या शिक्षणातला अविभाज्य घटक बालकापासून होते. वर्गातील प्रत्येक मूल स्वतंत्र आहे, एक वेगळं व्यक्तिमत्त्व आहे, प्रत्येक मुलाच्या क्षमता वेगवेगळ्या आहेत- हे समजून घ्यायला हवं. या मुलांच्या क्षमता अर्थात सबलता लक्षात घेऊन रचनावादाचे काम सुरू केले. हे करत असताना दोन विद्यार्थ्यांमध्ये तुलना न करणे, आपले विचार त्यांच्यावर न लादणे, त्यांना मुक्त वातावरण देणे- या काही गोष्टींची आचारसंहिता पाळली. निसर्गातले प्रत्येक फूल जसे निसर्गत:च वेगळे आहे, तसेच निसर्गातले प्रत्येक मूलसुद्धा वेगळे आहे. ज्याप्रमाणे गुलाबाचे सौंदर्य मोगऱ्याच्या फुलाला मिळू शकत नाही किंवा मोगऱ्याचा सुगंध गुलाबाला मिळू शकत नाही, त्याप्रमाणे एक मूल दुसऱ्या मुलासारखे कधीच असू शकत नाही. प्रत्येकाचे आपले एक वैशिष्ट्य आहे. हे वैशिष्ट्य त्याला शिकण्याकडचा प्रवास सुलभ करण्यासाठी सहायक ठरते. या वैशिष्ट्याकडून मुले स्वव्यक्तिमत्त्वाप्रमाणे घडत जातात. आज मुलांविषयी हे सारे समजल्यानंतर सर्वप्रथम मुलांचे भावविश्व शिक्षकांनी समजणे खूप आवश्यक वाटते. त्याशिवाय शिक्षकी व्यवसायात शिक्षकाने येऊच नये. मुलांचे भावविश्व समजून- उमजून काम करणे, ही रचनावादाची मला पहिली व महत्त्वाची पायरी वाटते.

माणसाचे मूल कसे शिकते, हे कोडं आता माणसाने उलगडले आहे. मज्जाशास्त्राच्या आधारे आज प्रत्येक मूल कसे शिकते, हे समजल्यावर मुलांना अधिकाधिक अनुभव देणे गरजेचे वाटते. परंतु हे अनुभव-आयोजन करताना पुढील दक्षता घ्यावी.

१) अनुभव नवनवीन असावेत. २) सहज घेता येतील असे असावेत. ३) मुलांचे पूर्वज्ञान गृहीत धरून योजलेले असावेत. ४) अनुभवातून अनुभूती व अनुभूतीतून कृती व कृतीतून निर्मिती व्हावी. ५) अनुभव आनंद देणारे असावेत.

मुलांना दिले जाणारे अनुभव यावर मुलं आपल्या ज्ञानाची पुनर्रचना करीत असतात. मुलांना अनुभव देणाऱ्या शिक्षकांनी अनुभव देण्यापूर्वी खालील गोष्टी कराव्यात.

१) अनुभवांचा गृहपाठ करावा, अर्थात अनुभवांचे नियोजन करावे. २) साधनसामग्री गोळा करावी. ३) पर्यायी व्यवस्थेची सोय असावी. ४) अनुभव घटकांशी जवळचे संबंध दर्शविणारे असावेत. त्यासाठी परिसरातून परिपूर्णतेकडचा प्रवास करावा. ५) विद्यार्थी कृती करत असताना शिक्षकांनी मार्गदर्शक मित्राचे काम करावे.

मुले दिलेल्या अनुभवातून स्वत:च्या ज्ञानाची निर्मिती स्वत: करतात. आनंद घेतात. शिकण्याचा आस्वाद घेतात. यातून मिळणारे ज्ञान त्यांच्या स्वत:च्या मालकीचे आहे याची त्यांना जाणीव होते. त्यामुळे हे स्वत: मिळवलेले ज्ञान स्मरणात चिरकाल टिकते. जेव्हा वाटेल तेव्हा त्यांना या ज्ञानाचा वापर करता येतो. यातून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो. हाच आत्मविश्वास शिक्षकांवर विश्वास टाकण्यास समर्थ बनवतो. असे झाल्यास शिकण्याची गोडी आपोआप निर्माण होते.

रचनावादात वेळोवेळी अनुभवांतून, कृतीतून शिकू देणे महत्त्वाचे आहे. तेवढेच या सर्वांचे मूल्यमापन वेळोवेळी होणेही आवश्यक आहे. हे मूल्यमापन करण्यासाठी खालील बाबी करता येतील.

१) गटात सादरीकरणाची संधी देणे. २) गटाचे सादरीकरण बघणे. ३) शब्दकोडी घेणे. ४) आव्हानात्मक प्रश्न मांडणे. ५) आव्हानात्मक परिस्थितीत मुलाच्या प्रतिसादाची नोंद घेणे. ६) खेळातून शिकणे, शिकण्यातून सहकाऱ्यांकडून मूल्यमापन. ७) संकल्पनांवर प्रश्नांची रचना. ८) गणिती कोडी सोडवायला देणे. ९) भाषिक खेळ घेणे. १०) विज्ञानातील प्रयोग, परिसर भेट.

'रचनावाद' जरी खूप व्यापक अर्थाचा संदर्भ दर्शवितो तरी माझ्या मते, रचनावादी वर्ग करण्यासाठी खालील पायऱ्यांनी ध्येयापर्यंत पोहोचता येईल.

१) मूल समजून घेणे. २) संकल्पनांवर आधारित अनुभव देणे. ३) कृती करू देणे. ४) स्वत: शिकू देण्याचे स्वातंत्र्य देणे. ५) चुकण्याची मोकळीक देणे. ६) आनंदाने शिकू देणे. ७) शिक्षकांनी सुलभकाचे काम पाहणे. ८) शेवटी विद्यार्थ्यांना नकळत त्यांचे मूल्यमापन करणे.

माझ्या मताप्रमाणे मी रचनावादाची व्याख्या अशी करेन - 'मुलांनी, मुलांसाठी, मुलांकरवी घेतले जाणारे शिक्षण म्हणजे रचनावादी शिक्षण.'



**- कल्पना बन्सोड**



शिकविण्याच्या जुनाट पद्धती, त्याच त्या वेळा वापरून कंटाळलेले शिक्षक आणि त्याच पद्धतीने शिकून कंटाळलेली मुले यांच्यामध्ये या पद्धतीमध्ये बदल घडवायचा असेल; तर आपली शिकवण्याची पद्धती बदलली पाहिजे, हे जेव्हा आपल्याला कळते-समजते तिथूनच ज्ञानरचनावादी पद्धतीकडे आपण वळतो. हीच ज्ञानरचनावाद स्वीकारण्याची पहिली पायरी आहे.

ज्ञानरचनावाद म्हणजे काय तर- ज्ञानाची स्वत:ची स्वत: रचना करणे, त्यासाठी एकमेकांमध्ये सुसंवाद साधणे, माहिती एकत्र करून माहितीचे रूपांतर ज्ञानात करणे होय. म्हणजे एखादा मुलगा 'हुशार' असे म्हणण्यापेक्षा तो 'चलाख' कसा होईल याकडे आपले लक्ष केंद्रित करणे होय. उदाहरणच घ्यायचे झाले तर- आईने आपल्या मुलीला चहा कसा करावयाचा शिकविला म्हणजे फक्त कृती सांगितली. गॅसवर पाणी ठेवून त्यात साखर, पावडर (चहा) टाकून दूध घालणे. पण जोपर्यंत मुलगी चहा स्वत: करून बघत नाही, तोपर्यंत तिला चहा करताच येणार नाही. जेव्हा ती करून बघेल, त्याचे प्रमाण ती स्वत: ठरवेल आणि नंतर त्याचा उपयोग करून सुंदर चहा बनवेल, तेव्हा घडतो रचनावाद.

ज्ञानरचनावाद म्हणजे कृतीतून स्वयंशिक्षण. मुलाला त्याच्या पूर्वज्ञानाशी-अनुभवांशी जोडून असणारे ज्ञान देणे किंवा माहिती देणे आणि मग त्यातून नव्या ज्ञानाची निर्मिती करणे. या निर्मिती केलेल्या ज्ञानाचा उपयोग करून नव्या ज्ञानाची निर्मिती करता येते. हे झाले ज्ञानरचनावादाबद्दल.

पण आपल्या वर्गात/ शाळेत ज्ञानरचनावाद पद्धती कृतीत आणताना आपल्या प्रत्येक बारीक-सारीक कृतीतून रचनावाद दिसला पाहिजे. रचनावाद म्हणजे फक्त भिंती रंगविणे आणि जमिनीवर बसून गणित करणे नव्हे, तर शिक्षकांना रचनावाद तीन पातळ्यांवर समजला पाहिजे.

१) तत्त्वज्ञान, २) शिक्षणविषयक विचारसरणी, ३) शिक्षणपद्धती.

शिक्षकांनी आपण आपल्या शाळेत रचनावादाची पार्श्वभूमी, त्यांचे विविध ग्रंथांतील लेखन हे तत्त्वज्ञानपातळीवर समजावून घेतले पाहिजे. आपल्या शाळेमध्ये शिक्षकांच्या व पालकांच्या शिक्षणविषयक विचारसरणी बदलण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत आणि आजच्या पिढीतील मुलांना ज्ञानरचनावादी पद्धतीने मार्गदर्शन करण्याची गरज असल्याचे पटवून द्यावे. वर्गामध्ये शिक्षक हा एका मार्गदर्शकाच्या भूमिकेत असावा.

१९९० च्या दशकामध्ये मेंदूशास्त्राचा शोध झपाट्याने लागत गेला आणि मेंदू हा एक 'शिकण्याचा अवयव' असल्याचे सिद्ध झाले. पण वर्गातल्या शेवटच्या मुलालाही शिकण्याचा अधिकार असल्यामुळे वर्गातील प्रत्येक मुलाला स्वतंत्रपणे त्याच्या गतीने शिकता आले पाहिजे. यासाठी ज्ञानरचनावादाशिवाय पर्याय नाही. त्याची सुरुवात स्वत:पासून करायला हवी.

**- रेखा भोसले**, इचलकरंजी

डिसेंबर १५ मध्ये रचनावादी अभ्यास-वर्गाबाबत मोहितेसरांकडून ऐकले. त्यापूर्वी रचनावाद म्हणजे पूर्वज्ञानाशी सांगड घालून नवीन अनुभव मुलांना देणे, इथपर्यंतच मजल गेली होती; परंतु तरीही वर्गाला उपस्थित राहता आले नाही. मात्र जानेवारीमधील वर्गाला उपस्थित राहण्याची संधी मिळाली. जानेवारीपासून

आजपर्यंत केलेले वर्ग यातून रचनावाद काही प्रमाणात उमजू मात्र लागला.

काल पानसेसरांनी सांगितलेली 'कृतियुक्त स्वयंअध्ययन' म्हणजे रचनावाद, ही अतिशय थोडक्यात पण अर्थपूर्ण व्याख्या.

शुक्रवारी तालुक्यातील शाळेत गेले. तिथे पहिलीच्या वर्गशिक्षिका मुलांना रचनावाद पद्धतीने शिकविण्याचा अट्टहास करत होत्या.

काही दगड व शिंपले यांचे साह्याने अंक-ओळख. तिथे साहित्य जरी रचनावादी पद्धतीचे असले तरी विद्यार्थ्यांनी स्वत: शिकण्यापेक्षा विद्यार्थ्याने लवकर उत्तर द्यावे म्हणून बाईंचे चाललेले प्रयत्न- किंबहुना, त्याला उत्तर सांगण्याची धडपड मनाला त्रास देऊन गेली. त्या वेळी बाईंना त्याचे पूर्वज्ञान पडताळून पाहावे व गटपद्धतीचा अवलंब करण्याबाबत सांगितले. विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान जाणून न घेता रचनावाद पद्धतीने शिकविण्याबाबतचा अट्टहास निरर्थक वाटतो.

अलीकडील काळात विद्यार्थ्यांना वेगवेगळे अनुभव वारंवार दिले जाणे आवश्यक आहे

**-प्रियांका पाटील**

शिक्षणक्षेत्रात मी गेली २४ वर्षे काम करीत आहे. त्यात शिक्षक म्हणून व अधिकारी म्हणून काम केलेले आहे. वर्तनवाद पद्धत नसानसात भिनलेली. त्याच पद्धतीने शिक्षक घेतले व त्याच पद्धतीने विद्यार्थ्यांना घडविले. मात्र गेल्या वर्षभरामध्ये (ग्राममंगलच्या अभ्यासवर्गात आल्यानंतर) ज्ञानरचनावादाबद्दल ऐकलेले होते. पण संकल्पना अस्पष्ट असल्यामुळे अडचणी येत होत्या. मात्र ग्राममंगलच्या गेल्या नऊ वर्गांना उपस्थित राहिल्यामुळे मला रचनावाद चांगल्या प्रकारे समजला.

रचनावादाकडे जाताना पहिल्यांदा आपल्याला आकलनवाद समजून घ्यावा लागतो. तो समजल्यावरच पुढे जाता येते. त्यानंतर प्रत्येक मूल वेगळे असल्यामुळे मूल समजून घेणे महत्त्वाचे. त्यानंतर प्रत्येक मुलाच्या उपजत क्षमता लक्षात घेऊन त्या उपजत गुणांना वाव देण्याचा प्रयत्न रचनावादामध्ये केला जातो. प्रत्येक विद्यार्थ्याला संधी देण्याचा, त्याच्यासाठी संधी निर्माण करण्याचा प्रयत्न यामध्ये केला जातो. त्यामुळे विद्यार्थ्याच्या कृतिशीलतेला वाव मिळतो. प्रत्येक विद्यार्थ्याच्या मताला आदर दिला जातो. त्यामुळे वर्गातील प्रक्रिया ही विद्यार्थिकेंद्रित खऱ्या अर्थाने होते.

बालस्नेही वातावरण, आनंददायी शाळा या सर्व बाबी रचनावादामुळे सहजपणे शक्य होतात. रचनावादामुळे शाळेच्या पातळीवर काही मूलभूत प्रकारचे बदल होतात. मुलांच्या मुक्त हालचालींना स्वातंत्र्य देण्यासाठी वर्गामध्ये, व्हरांड्यामध्ये बदल होतात. शिक्षकांच्या पातळीवर बदल घडतात. शिक्षक आता मुलांना शिकवत नाहीत, तर सर्वांगीण गुणवत्ताविकास करण्यासाठी मुलांना विविध प्रकारच्या संधी निर्माण करतात. मार्गदर्शकाची भूमिका बदलून आता शिक्षक सुलभकाच्या भूमिकेत दिसतात. त्यामुळे विद्यार्थी-शिक्षक यांच्यातील आंतरक्रिया सहज सुलभ होते. विद्यार्थी आनंदी व प्रफुल्लित दिसतात. शिकण्याची आवड त्यांच्यामध्ये निर्माण होते. जिज्ञासा जागृत होऊन नवे ज्ञान स्वत:हून मिळविण्याची आस त्यांच्यामध्ये निर्माण होते. हा जो बदल होतो तो रचनावादामुळेच. या अर्थाने विद्यार्थ्यांमधील गुणवत्ताविकास करण्याची धमक रचनावाद या शिक्षणप्रणालीमध्ये आहे.

**-एस. मोहितो**

अनुभव

केतकी बाला

# रचनावादी कार्यशाळेचा अनुभव

**दिनांक १ व २ ऑगस्ट १६ ला चंद्रपूर येथे झालेल्या प्रा. रमेश पानसे यांच्या रचनावादी कार्यशाळेस इयत्ता दहावीतील केतकी उपस्थित होती. या वर्गाचा अनुभव तिच्याच शब्दांत...**

मला अलीकडेच म्हणजे १ आणि २ ऑगस्टला शिक्षकांच्या एका कार्यशाळेला उपस्थित राहण्याची संधी माझ्या आईमुळे मिळाली. म्हणजे माझ्या आईने मला या कार्यशाळेची माहिती दिली व 'तू येऊ इच्छितेस काय?' असे विचारले. 'मेंदूशास्त्र, रचनावाद आणि आकलनवाद' असा विषय होता. मग मी का बरं नाही म्हणू? मी पट्कन होकार दिला. तेव्हा माझ्या शाळेत प्रथम घटक चाचणी सुरू होती. मग मी असं ठरवलं की, शाळेत जाऊन परीक्षा द्यायची आणि मग कार्यशाळेला उपस्थित राहायचं. आमचा पेपर दहा वाजता सुटायचा. मी शाळेतून तशी परवानगी घेतली. त्यांनी मला परवानगी दिली. सेमिनार फ्री नव्हतं. तिथे सहभागी होण्यासाठी २००० रु. फी होती. आईने माझीसुद्धा २००० रु. फी भरली.

मी पहिल्यांदाच एका कार्यशाळेस उपस्थित राहणार होते आणि तेही आम्हा मुलांसाठीच्या नाही, तर शिक्षकांसाठी असलेल्या कार्यशाळेस. मी खूपच उत्सुक होते. खूप आनंदी होते. आणि मुख्य म्हणजे माझा तो आनंद, ती उत्सुकता शेवटपर्यंत कायम राहिली.

दि. १ ऑगस्टला घटक चाचणीचा पेपर सोडवून मी माझ्या आईसोबत कार्यशाळेस गेले. सिद्धार्थ हॉटेलमध्ये सेमिनार होतं. छान व्यवस्था होती. तिथे सर्व प्रशिक्षणार्थी जे होते ते शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षणक्षेत्रातील काही अधिकारीसुद्धा होते. रमेश पानसे, दिनेश नेहते आणि सुषमाताई यांनी सेमिनार घेतले. ते सर्व पुण्याहून आले होते. या दोन दिवसांत मी त्यांच्यात इतकी मिसळले की, असं वाटायचं- त्यांना पानसे आजोबा, सुषमामावशी आणि दिनेशकाका अशा नात्यांनी हाक मारावी. माझी ही त्यांच्याशी पहिली भेट. माझी आई त्यांना सात आठ वर्षांपासून ओळखते. पण दिनेशकाकांबरोबर ही तिची पहिली भेट होती. हे सेमिनार शिक्षकांसाठी होतं. पण मी त्यात सहभाग घेतला. तसं बघितलं तर, तिथे गेल्यावर सर्व शिक्षक विद्यार्थीच बनले होते. म्हणून तर मला तिथे खूपच करमलं आणि तिथल्या प्रत्येकाशी माझी गट्टी जमली. या दोन दिवसांत मला त्यांच्याकडून खूप प्रेम मिळालं आणि पुष्कळच शिकायला मिळालं.

दिनेशकाकांकडून मेंदूबद्दल फारच रंजक माहिती कळली. पानसे आजोबांकडून तर फार मोलाचं आणि महत्त्वाचं शिकायला मिळालं. माझी आई घरी आणि बाहेरही नेहमी जे बोलत आणि सांगत

असते, तेच सर्व मला तिथे ऐकायला मिळालं. पण ते सर्व मेंदूशी संबंध जोडून ऐकायला आणखीनच मज्जा येत होती. आणि सुषमामावशीने मृदू-मऊ बोलत मुलांना विविध शैक्षणिक अनुभव कसे हसत-खेळत द्यावेत याची इतकी सुंदर प्रात्यक्षिकं दाखविली की, सर्व जण त्यात हिरीरीने सहभागी होत होते. मीसुद्धा शिक्षक, अधिकाऱ्यांसोबत आवडीने त्यात सहभागी झाले. सर्व मोठी माणसे आणि त्यात मी एक छोटी मुलगी. पण मला फारच मजा येत होती. पानसे आजोबांच्या अभ्यासपूर्ण, भावनांना हात घालणाऱ्या पण मधून-मधून खसखस पिकविणाऱ्या, तर कधी पोटभर हसायला लावणाऱ्या वाणीतून ऐकताना सगळे अंतर्मुख होत होते. मोकळेपण व स्वातंत्र्य मिळालं की, आपल्याला आपल्या भावना व्यक्त करण्याची व प्रश्न विचारण्याची इच्छा होते. या सेमिनारमध्ये चर्चाच आम्हा विद्यार्थ्यांवर होत होती; त्यामुळे माझ्या मनात एकानंतर एक प्रश्न येत होते, आठवत होते व निर्माणही होत होते. मला तिथे प्रश्न विचारण्याची संधीदेखील मिळाली आणि मी प्रश्न विचारला की, शिक्षक मुलांना का रागावतात आणि मारतात? या रागावण्याचा मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर काय परिणाम होतो? असे रागावण्याचा किंवा मारण्याचा हक्क शिक्षकांना आहे का?

मुलांना शिक्षा केल्याने मुलांच्या मनात सुरू असलेले चांगले किंवा क्रिएटिव्ह विचार बंद होऊन नकारात्मकतेकडे किंवा भयाकडे मूल कसे पोचते, हे अगदी मेंदूशास्त्राद्वारे पानसे आजोबांनी खूप छान समजून सांगितले. वरून असेही सांगितले की, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नाही तर विद्यार्थ्यांनीच शिक्षकांना रागवायला हवे. मी हा प्रश्न मुद्दामच विचारला; कारण तिथे सर्व शिक्षक होते त्यांना कळावे की, मुलांना मारू किंवा रागावू नये. आणि खास गोष्ट म्हणजे, माझ्या सध्याच्या शाळेच्या संस्थाप्रमुख या कार्यशाळेस उपस्थित होत्या. त्या रोज आणि पूर्ण दिवसभर शाळेत उपस्थित असतात. म्हणजे शाळेचा पूर्ण कारभार त्याच पाहतात. त्यांच्याही कानांवर हे सर्व पडत होते, त्यामुळे मला आनंदाच्या उकळ्याच फुटत होत्या. म्हणजे असे नाही की, हे सेमिनार झाल्यानंतर मी माझ्या शिक्षकांना रागवेन. मात्र त्यांना हे सर्व कळणे फारच आवश्यक आहे, कारण शिक्षकांना हे सर्व न कळल्यामुळे मुलांचे व एकूणच पुढच्या पिढ्यांचे जे नुकसान होत आहे, त्यास सीमा नाही आहे. हे सर्व त्वरित थांबावे, असे मला खूप तीव्रतेने वाटते. खरे तर यामुळे मी बऱ्याचदा अस्वस्थ असते. मुलांना मारू नये, अशी तरतूद आर. टी. ई. कायद्यात तर केली गेलीय; मात्र हा अन्याय, हे दु:ख, हा अपमान, ही मानहानी सहन करत आहेत, भोगत आहेत. आणि स्वत:वरचा विश्वास गमावत आहेत, असे मला वाटते. मी हे सर्व माझ्या शाळेत बघते आणि यामुळे मी फार अस्वस्थ असते. आईशी या विषयावर मी सतत बोलत असते. हे आम्हा विद्यार्थ्यांचे आनंदाने शिकण्याचे दिवस आहेत. अशा या दिवसांत भीतिदायक, तणावग्रस्त वातावरणात आम्ही जगत आहोत असे मला वाटते.

असो. मात्र मला हे जाणून फार आनंद झाला की, हे सगळे लोक आम्हा विद्यार्थ्यांसाठी काही चांगलं करता यावं म्हणून हे जाणून-समजून घेण्यासाठी आले होते. येथे सर्व जण आमच्याबद्दल एवढा विचार करत आहेत, या विचाराने माझं मन भरून आलं. प्रतिक्रिया देता-देता मला गहिवरून आलं. पण मी स्वत:ला सावरलं. माझ्या घरी या विषयावर नेहमीच चर्चा होत असल्यामुळे मी तर या मार्गाने जाण्याचा निर्णय केला होताच; पण आता तर या सगळ्यांनी जे कार्य हातात घेतलं आहे व ते जिथपर्यंत ते कार्य नेऊन पोचवतील तिथून ते कार्य पुढे नेण्याच काम मी करणार असा निर्धार मी माझ्या मनोगतात बोलून दाखविला. मी म्हणाले, मी आता दहावीत आहे. चांगल्या शिक्षकांच्या व शिक्षणाच्या शोधात मी आतापर्यंत पाच शाळा बदलल्या; पण मला हवे तसे शिक्षक व शिक्षण मिळाले नाही, याबद्दल मला फार वाईट वाटते. मात्र यानंतर येणाऱ्या मुलांना तरी चांगले शिक्षक व शिक्षण मिळावे, अशी माझी इच्छा आहे आणि त्यासाठी मी प्रयत्न करीन.

मुलांना शिकायला आवडतं, मुले स्वत: शिकू इच्छितात, मुलांना शिकू दिले पाहिजे, मुलांच्या शिकण्यात अडथळा बनू नये आणि त्यासाठी शिक्षकांनी कल्पनाशक्ती व कौशल्ये वापरण्याबाबत या सेमिनारमध्ये आग्रह होता. हे अगदी खरं आहे. माझ्या आईकडून मी हे अनुभवले आहे. माझी आई तर मुलांबरोबर हे प्रयोग सतत करत असते. त्यामुळे माझ्या आईला मुलांना समजून घेता येते. म्हणून आमचं- म्हणजे माझं व माझ्या भावाचं- तिच्याशी खूप पटतं. ती तर माझी बेस्ट फ्रेंड आहे. मी तिला माझ्या जीवनातील प्रत्येकच गोष्ट सांगत असते आणि ती माझ्याशी विचारपूर्वक वागत असते, म्हणजे समजदारीने वागत असते. माझ्या आईने मला एक गोष्ट सांगून ठेवलीय, जी माहीत झाल्यामुळे मला एक मोठं सत्य माहीत झाल्यासारखं वाटलं होतं. ती म्हणजे, 'मोठ्यांना लहानांशी वागता न आल्यामुळे व समजून न घेता आल्यामुळे समस्या निर्माण झाल्या.' खरं तर ही खूप कठीण गोष्ट आहे, असे मला मग हळूहळू कळत गेले. पण इतकी पण कठीण नाही, की झेपणारच नाही. पण मग तेच तर खरे आव्हान आहे आणि त्यापुढे आनंद आहे. खरेच खूप-खूपच गरज आहे, मुलांशी समजूतदारपणे वागण्याची. तेव्हाच तर आम्ही मुलेसुद्धा समजूतदार होऊ ना ?

पानसे आजोबा आम्हा मुलांच्या बाजूने इतकं सुंदर बोलत होते की, मला त्यांना मिठीच मारावीशी वाटली. आणि खरंच मी त्यांना मिठी मारली. मला या कार्यशाळेला येऊन खूप आनंद झाला. हा माझ्यासाठी एक अविस्मरणीय अनुभव होता. हे सेमिनार झाल्यापासून मी खूप आनंदी आहे आणि कदाचित जन्मभर आनंदी राहणार आहे. कारण यात मानवी जीवन आनंदाने जगण्याचे आणि इतरांना पण आनंदी करण्याचे इतके सहज व शास्त्रीय तंत्र सहजपणे उलगडत जाते की, त्याने मन आनंदी होते. म्हणजे आपला मेंदू आपल्याला कळला की, बाकी सर्व सोपं होऊन जातं. ही मेंदूची घडण आणि त्याचे कार्य इतकं रोमहर्षक आहे की, स्तिमित आणि अंतर्मुख व्हायला होतं. आपला मेंदू आपल्याला कळला की, आपलं वागणं आपल्या नियंत्रणात सहज आणता येतं.

हे सेमिनार मला खूप आवडण्याचं कारण म्हणजे, मला शाळेत दिसणाऱ्या सर्व समस्या तिथे चर्चिल्या जात होत्या. शिस्त-शिक्षा या नावाखाली मुलांवर होणारे अत्याचार, मुलांना न आवडणारे होमवर्क, मुलांना शाळेत लागणारी झोप, शिक्षकांना मुलांचा येणारा राग, ते जड दप्तर, मुलांचे भावविश्व, खेळ, सौंदर्य, भावना, आनंद या सर्व गोष्टी ऐकताना आणि त्यासोबतच मेंदूच्या इमेजेससह समजून घेताना मला खूप आनंद होत होता. याचबरोबर दिनेशकाकांनी तिथे हे पण सांगितलं की, 'जसजसं आपण आणखी नवनवीन गोष्टी शिकत जातो तसतसे आपल्या मेंदूत नवनवीन न्यूरॉन्स तयार होत जातात. जर का आपण खूप जास्त काही तरी शिकलो, तर आपलं डोकं जड वाटायला लागतं व आपल्याला झोप पण यायला लागते; कारण आपल्या मेंदूने खूप मेहनत केली असते नं, तर त्याला आरामाची गरज असते. त्यांनी म्हटल्याप्रमाणे आम्हाला मधे-मधे हात लांब करून आळस झटकायला सांगितला. तसं बघितलं तर, आम्ही तर शाळेत सतत साडेपाच-सहा तास शिकत असतो; मग या वेळात तर आम्हा विद्यार्थ्यांना झोप येणेच आहे, आळस येणेच आहे. मग शिक्षकांनी पण आम्हाला वर्गात झोपू द्यायला पाहिजे. मला नं त्यातला 'तीन मेंदू घसरणीचा सिद्धांत' खूप आवडला आणि कळालं की, आपल्याला राग का येतो किंवा भीती का वाटते?

पानसे आजोबा म्हणाले की- 'तुम्ही सर्व ताठ मानेने जगा, कारण तुम्हाला आता खूप काही कळले आहे. तुम्ही मुलांच्या बाबतीत, स्वत:च्या बाबतीत शहाणे झाला आहात. हे शहाणपण स्वत: आचरणात आणा, इतरांनाही हे शहाणपण सांगा. पानसे आजोबांनी इतका सुंदर मांडला होता हा विषय की पण असू द्या. इतकं सारं मी यात सांगू शकणार नाही. पण खरंच खूप महत्त्वाचं आहे शहाणं होणं. तशी मी तर आहेच, थोडी शहाणी. पण या सेमिनारमुळे मी अधिकच शहाणी झालेय आणि ठरवलंय की,

अधिकाधिक शहाणं होत राहायचं.

***

शोध-बोध

प्राचार्य
**डॉ. कैलास बवले**

# मनुष्यबळ विकास मंत्रालय : उपक्रम, योजना व विकास

**(मानव संसाधन विकास मंत्रालय)**

कोणत्याही देशाची मानवी साधनसंपत्ती ही देशाच्या विकासाचा क्रियाशील घटक असते. एकूण लोकसंख्येचे वयानुसार वर्गीकरण केल्यास कर्ती किंवा उत्पादक लोकसंख्या आणि अवलंबित लोकसंख्या याचे प्रमाण काढता येते. भारताबाबत २०३० पर्यंत लोकसंख्येबाबत एक अत्यंत अनुकूल घटक आहे, तो म्हणजे- तरुणाईची सर्वाधिक लोकसंख्या असणारा हा जगातला एक देश असणार आहे. यालाच अर्थशास्त्रीय भाषेत 'लोकसंख्येचा लाभांश' असे म्हणतात.

लोकसंख्येला विकासाशी जोडून देशाला प्रगतीपथावर नेण्याची ही नामी संधी आपल्याला चालून आली आहे. मात्र त्यासाठी संख्येने मोठ्या प्रमाणात असलेल्या तरुण मनुष्यबळाला गुणवत्तापूर्ण शिक्षण, प्रशिक्षण आणि व्यावसायिक कौशल्ये प्राप्त करून देण्याची नितांत गरज आहे.

मानव संसाधन विकास मंत्रालय हे देशाच्या शिक्षणव्यवस्थेशी संबंधित महत्त्वाचे मंत्रालय आहे. प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षण आणि संशोधन संस्थांचे नियमन, व्यवस्थापन आणि नियंत्रणाचे काम या मंत्रालयाच्या माध्यमातून केले जाते. देशाची संपूर्ण शिक्षणव्यवस्था या मंत्रालयाच्या आधिपत्याखाली ध्येय-धोरणं आणि मार्गदर्शनानुसार काम करीत असल्याने देशाच्या विकासासाठी कार्यक्षम व गुणवत्ताप्रधान मनुष्यबळ निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य या मंत्रालयाकडून केले जाते.

या दृष्टीने गेल्या दोन वर्षांत या मंत्रालयाकडून निम्न-प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, उच्च शिक्षण आणि संशोधन व्यवस्थेत कोणत्या प्रकारचे कार्य झाले आहे, याचा थोडक्यात आढावा आपण घेणार आहोत.

केंद्र शासनाने २०१४ ते २०१६ या दोन वर्षाच्या कालावधीत देशाच्या शिक्षणव्यवस्थेत काही मूलगामी बदल करण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न करताना पूर्वीच्या सरकारने सुरू केलेल्या महत्त्वपूर्ण योजनांची चौकट मात्र अबाधित ठेवली आहे.

सन २००९-१० पासून या देशाच्या औपचारिक व अनौपचारिक शिक्षणव्यवस्थेत काही महत्त्वाचे प्रकल्प व उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. त्यामध्ये शालेय शिक्षण व साक्षरता विभागाच्या वतीने प्रौढ शिक्षण व निरंतर शिक्षण यासाठी 'साक्षर भारत' ही महत्त्वाकांक्षी योजना देशातील ७ कोटी निरक्षरांना १२ व्या पंचवार्षिक योजनेअखेर साक्षर करण्याच्या हेतूने सुरू करण्यात आली होती. प्राथमिक शिक्षणासाठी 'सर्व शिक्षा अभियान' (SSA), तर माध्यमिक शिक्षणासाठी राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (RMSA) आणि २०१३ मध्ये उच्च शिक्षण-व्यवस्थेसाठी राष्ट्रीय उच्चतम शिक्षा अभियान (RUSA) सुरू करण्यात आले. या पार्श्वभूमीवर केंद्रशासनाच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाची कामगिरी पाहावी लागेल.

उच्च शिक्षण विभाग, व्यावसायिक शिक्षणाच्या दिशेने टाकलेले पाऊल आणि शालेय शिक्षण व साक्षरता विभागाची कामगिरी अशा तीन पातळ्यांवर ही कामगिरी पाहता येईल. या प्रत्येक विभागातील शिक्षणाला देशाच्या विकासाशी जोडण्याचा आणि त्यासाठी व्यावसायिक शिक्षण, तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर, संशोधनासाठी विविध योजनांची आखणी, शिक्षणातील स्त्री-पुरुष विषमता कमी करण्यासाठीचे विशेष प्रयत्न या गोष्टी या सरकारने जाणीवपूर्वक केल्याचे दिसून येते. त्याचा आपण विभागनिहाय आढावा घेऊ.

सन २०१४ ते २०१६ या दोन वर्षांच्या कालावधीत उच्च शिक्षण विभागासाठी या मंत्रालयाने विविध सात प्रकारच्या नव्या योजना सुरू केल्या आहेत. त्यामध्ये इम्प्रिंट इंडिया (भारताचा ठसा), ग्लोबल इनिशिएटिव्ह फॉर ॲकॅडेमिक नेटवर्क, नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (NIRF), सक्षम शिष्यवृत्ती योजना, स्टार्ट-अप प्रमोशन, उन्नत भारत अभियान, उच्चतर आविष्कार अभियान यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

इंप्रिंट इंडिया हा ५ नोव्हेंबर २०१५ रोजी सुरू केलेला २०१५-१६ या वर्षासाठी ५० कोटी रुपये निधीची तरतूद असलेला आय. आय. टी. आणि आय. आय. एस. यांच्या संयुक्त सहभागातून राबविला जाणारा संशोधन प्रकल्प होय. ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनमानावर परिणाम करणारी विविध १० क्षेत्रे या संशोधन प्रकल्पात समाविष्ट आहेत. त्यात आरोग्य, ऊर्जा, पाणी, संगणकविज्ञान, संरक्षण, वातावरण बदल इ. चा समावेश आहे.

जगातील उत्तम दर्जाचे शिक्षणतज्ज्ञ भारतातील विद्यापीठांत आकर्षित करण्यासाठी सुरू केलेला प्रकल्प म्हणजे ग्लोबल इनिशिएटिव्ह फार ॲकॅडेमिक नेटवर्क (GIAN) होय. दि. ७ एप्रिल २०१५ रोजी या प्रकल्पास मान्यता देण्यात आली. विविध ३७१ विषयांत, ३२ देशांतून १६० संस्थांचा सहभाग या प्रकल्पात अपेक्षित आहे. आतापर्यंत ६५ विषयांत २६४८ विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ मिळाला आहे. भारतातील विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्था आणि परकीय विद्यापीठे यांच्यातील सहकार्य व भागीदारी वाढून आपले उच्च शिक्षण दर्जेदार व्हावे, हा यामागील हेतू आहे.

उच्च शिक्षण संस्थांच्या मूल्यमापनासाठी देशपातळीवर नॅक संस्था कार्यरत आहे. दि. २९

सप्टेंबर २०१५ रोजी राष्ट्रीय पातळीवर उच्च शिक्षण संस्थांच्या मूल्यमापनाची चौकट असावी, या हेतूने नॅशनल इन्स्टिट्यूशनल रॅंकिंग फ्रेमवर्क तयार करण्यात आले. पाच वेगवेगळ्या निकषांवर विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्थांची मूल्यमापन पद्धती निर्माण केली असून प्रत्येक वर्षी एप्रिल महिन्याच्या पहिल्या सोमवारी देशातील संस्थांची मूल्यमापनावर आधारित क्रमवारी जाहीर केली जाणार आहे. यासाठी २५०० संस्थांनी अर्ज केले असून जागतिक गुणवत्ता क्रमवारीत उतरण्यास त्याचा फायदा होणार आहे. स्टार्ट-अप प्रमोशन या योजनेअंतर्गत ३७ नवे स्टार्ट-अप पार्क सुरू करण्यात आले आहेत. देशाचा विज्ञान-तंत्रज्ञान विभाग, आय. आय. टी., एनआयटी व केंद्रीय विद्यापीठे यांची ही संयुक्त योजना आहे. या अंतर्गत ११ बिझिनेस इन्क्युबेशन सेंटर्स व १० स्टार्ट-अप सेंटर्सला मान्यता देण्यात आली आहे.

देशाच्या ग्रामीण विकासासाठी या सरकारने उच्च शिक्षणाला ग्रामीण विकासाशी जोडण्याच्या हेतूने एक महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली. तिचे नाव **उन्नत भारत अभियान**. उच्च शिक्षण आणि समाज जोडण्यासाठी ही योजना असून ग्रामीण भागाच्या विकासासाठी विज्ञान-तंत्रज्ञानाचा उपयोग हा यामागील हेतू आहे. या योजनेअंतर्गत सर्व तांत्रिक शिक्षण संस्थांनी आणि उच्च शिक्षण संस्थांनी प्रत्येकी पाच गावे विकासासाठी दत्तक घ्यावीत. तंत्रज्ञानातील गॅप शोधून काढून ती भरून काढण्याचे नियोजन आराखडे तयार करावेत. त्या गावांच्या विकासाची योजना तयार करून ती राबवावी, अशी अपेक्षा आहे. या अभियानाच्या पहिल्या टप्प्यात ८९ जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. विविध संस्थांनी १२८ खेडी दत्तक घेतली आहेत. सन २०१५-१६ साठी १० कोटी रुपयांची तरतूद यासाठी करण्यात आली.

नवोपक्रमाला वाव देण्यासाठी सर्व आय. आय. टी. संस्थांनी उद्योगांबरोबर काम करावे व नवताक्षेत्रांचा शोध घ्यावा, म्हणून या शासनाने **'उच्चतर आविष्कार अभियान'** सुरू केले आहे. दर वर्षी या उपक्रमासाठी २५० कोटी रु. ची गुंतवणूक अपेक्षित आहे.

उच्च शिक्षणाला उपयोजित करण्याच्या हेतूने व्यावसायिक शिक्षणाच्या दिशेने नेण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या माध्यमातून ज्या योजना सुरू आहेत, त्यामध्ये १) करिअर ओरिएंटेड कोर्सेस २) कम्युनिटी कॉलेजेस ३) व्यावसायिक शिक्षणात पदवी (BVOC) या आहेत.

या योजनांच्या बरोबरीने केंद्र शासनाने सुरू केलेली योजना म्हणजे कौशल भारत योजना होय. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे नावाने सुरू झालेली Knolwedge Aquisition and Upgradation of skilled Human Abilities and livelihood (KAUSHAL) हे तिचे विस्तारित नाव. या आर्थिक वर्षात १.५ कोटी लोकांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण हे उद्दिष्ट आहे. सध्याच्या परंपरागत शिक्षणाबरोबर व्यावसायिक शिक्षणाला जोडण्याच्या हेतूने 'कौशल भारत'बरोबरच इतर काही योजना आखल्या आहेत. त्यामध्ये नॅशनल स्किल क्वालिफिकेशन फ्रेमवर्क (NSQF), समवय- म्हणजे स्किल असेसमेंट मॅट्रिक्स फॉर व्होकेशनल ॲडव्हान्समेंट ऑफ युथ (SAMVAY) व स्वयम म्हणजे Study Webs of Active Learning for Young Aspiring Minds (SWAYAM) यांचा समावेश आहे.

स्वयम हे एक वेब पोर्टल असून तिथे (MOOC) म्हणजे Massive Online Open

Courses उपलब्ध आहेत. हा एक प्रकारे भारतीय ई-लर्निंग प्लॅटफॉर्म आहे, जिथे माध्यमिक ते पदवी पातळीपर्यंतचे कोर्सेस उपलब्ध करून देत आहे. मार्च २०१६ पर्यंत २००० कोर्सेय, १० लाख विद्यार्थी असे ध्येय निश्चित केले आहे. आतापर्यंत ५०० कोर्सेस तयार झाले आहेत.

सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात उच्च शिक्षण विभागासाठी १६५०० कोटी रु.ची तरतूद असून त्याची विभागणी याप्रमाणे-

-४९७२.९४ कोटी UGC व AICTE साठी

-१३०० कोटी RUSA साठी- ३०६ विद्यापीठे व ८५०० महाविद्यालये

- ५५२ कोटी- डिजिटल इंडिया, (e-learning) साठी- २६,५०० जर्नल्स, २१५ विद्यापीठे व ५००० महाविद्यालये आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या ८६ संस्था यांच्या गुणवत्तावाढीचा उपक्रम आहे.

- केंद्रीय अनुदान संस्थासाठी - ८८८० कोटी

- उच्च शिक्षण विभागानंतर मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या आधिपत्याखालील दुसरा विभाग म्हणजे शालेय शिक्षण व साक्षरता विभाग होय. या विभागाच्या वतीनेही राष्ट्रीय पातळीवर काही नावीन्यपूर्ण योजना व उपक्रम गेल्या दोन वर्षांत सुरू करण्यात आले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या हेतूने सुरू झालेला सर्व शिक्षा अभियान हा शालेय शिक्षण विभागाचा महत्त्वाचा उपक्रम होय. या अंतर्गत शिक्षणात स्त्री-पुरुष समानता निर्माण करण्याच्या हेतूने डिजिटल यंत्रणेच्या वापरातून प्राथमिक शिक्षणात गुणवत्ता सुधार व्हावा म्हणून या सरकारने मागील दोन वर्षांत काही नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू केले आहेत. जेंडर पॅरिटी इंडेक्स (लिंगसमानता निर्देशांक), डिजिटल जेंडर ॲटलास, स्वच्छ विद्यालय इनिशिएटिव्ह (SVI), बेटी बचाओ -बेटी पढाओ योजना, पढे भारत - बढे भारत योजना (PBBB), राष्ट्रीय आविष्कार अभियान - ही त्यातील काही उदाहरणे.

मुलींचे शिक्षणातील प्रमाणात वाढून लिंग-समानता निर्देशांकात सुधारणा व्हावी, म्हणून सुरू असलेली योजना म्हणजे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय होय. शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या गटांमध्ये जिथे स्त्रियांची साक्षरता ही देशाच्या स्त्री-साक्षरतेपेक्षा कमी आहे, तिथे निवासी शाळा सुरू करण्याची ही योजना होय. अशा ३६०९ विद्यालयांतून ३.५३ लाख मुली शिक्षण घेत आहेत. युनिसेफच्या साह्याने निर्माण केलेले साधन म्हणजे डिजिटल जेंडर ॲटलास. याच्या साह्याने जागतिक महिलादिनाच्या निमित्ताने ८ मार्च २०१५ रोजी बेटी बचाओ-बेटी पढाओ योजनेची सुरुवात करण्यात आली. या अभियानात १०० जिल्ह्यांची निवड करून त्यासाठी ५ कोटी रु.चा निधी उपलब्ध करून दिला. त्यातून प्रत्येक जिल्ह्याला ५ लाख रु.ची यांची बक्षीस योजना तयार करण्यात आली. त्यातून १००% मुलींची नोंदणी करणाऱ्या प्राथमिक शाळेस, मुलींची संख्या टिकवून ठेवणाऱ्या माध्यमिक शाळेस व उच्च माध्यमिक शाळेस प्रत्येकी १ लाख रु.ची बक्षीस योजनाा जाहीर करण्यात आली आहे.

माध्यमिक शिक्षण विभागाच्या पातळीवर राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत २०१५-१६ साठी ३५६५ कोटी रु.ची तरतूद केली असून या योजनेअंतर्गत ११५९९ नवी माध्यमिक विद्यालये मंजूर करण्यात आली आहेत. त्याबरोबरच अस्तित्वातील ३७,७३१ विद्यालयांच्या

बळकटीकरणासाठी निधी उपलब्ध केला आहे. याचा परिणाम म्हणून विद्यार्थी-प्रवेशाचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. या पातळीवरील शिक्षणाची गुणवत्ता वाढावी म्हणून केंद्र सरकारने सुरू केलेल्या नव्या योजना म्हणजे राष्ट्रीय खुल्या शैक्षणिक साधन केंद्रांची निर्मिती (National Repositary of Open Educational Resources (NROER)) यामध्ये सध्या २९ भाषांतील २०,००० खुल्या शिक्षण-साधनांचा समावेश आहे. ई-प्लॅटफॉर्म ही ७ नोव्हेंबर २०१५ रोजी (NCERT)च्या साह्याने सुरू केलेली योजना ई-कंटेन्ट - कोणत्याही वेळी व कोणत्याही ठिकाणी तो प्लॅटफॉर्म वापरण्याची सुविधा- असे या योजनेचे स्वरूप आहे. शाळांचा दर्जा सुधारावा म्हणून मूल्यमापन आकृतिबंध तयार करण्यात आला, त्याचे नाव 'शाळा सिद्धी' होय. तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर व्हावा म्हणून मोबाईल ॲप असलेली 'सारांश' योजना १६२९६ शाळापर्यंत पोहोचली आहे. याशिवाय शाळा दर्पण प्रोजेक्ट, जीआयएस मॅपिंग, नॅशनल अचिव्हमेंट सर्व्हे, 'कला उत्सव' हे अधिकीचे उपक्रम आहेत. शेवटी शिक्षणाची गुणवत्ता शिक्षकांच्या गुणवत्तेशी जोडलेली असते. म्हणून-

शिक्षक गुणवत्तावाढ व शिक्षक प्रशिक्षण यासाठी २०१५-१६ मध्ये ५५७ कोटींची तरतूद असून ६९ नवी 'डायट' सुरू करण्यात येणार आहेत. तसेच १५ शिक्षक शिक्षण महाविद्यालये, ७ उच्च शिक्षण संस्था नव्याने सुरू करण्यात येणार आहेत. प्रौढ व निरंतर शिक्षणासाठी साक्षर भारत अभियानास कौशल्य विकास व आर्थिक विकास योजनांची जोड दिली असल्याने शिक्षणाला विकासाशी जोडण्याचा हा स्तुत्य प्रयत्न असल्याचे दिसून येते.

थोडक्यात, सर्व पातळ्यांवरील शिक्षणातून गुणवत्ताप्रधान मनुष्यबळाची निर्मिती व्हावी, या हेतूने प्रत्येक पातळीवर या सरकारने उपक्रम व योजना जाणीवपूर्वक सुरू केल्या आहेत. काळाच्या ओघात त्यांचे चांगले परिणाम दिसतील, अशी अपेक्षा करू या.

***


वार्षिक वर्गणी रुपये ४००/- + पोस्टेज खर्च रुपये ७०/-

किंवा ग्राममंगल संस्थेला १०,००० रुपये वा अधिक देणगी द्या.

'८० जी' कलमाखाली आयकरातून सूट मिळवा आणि

दरमहा 'शिक्षणवेध'चा अंकही मिळवा.

वर्गणी रोख/चेक/ड्राफ्टने 'ग्राममंगल' या नावाने पाठवू शकता.

मुंबई-पुणे बाहेरील चेकसाठी रुपये ३०/- वटणावळ आवश्यक.




**पुणे कार्यालय :**

ग्राममंगल, गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरूड,

पुणे ४११ ०३८. संवाद : ०२० २५३८६६८७

विचार

डॉ. दिनेश नेहते

# पालकत्व ही काय शिकण्याची गोष्ट आहे का?

## आमच्या आई -बाबांनी नाही का आम्हाला वाढविले?

खरे आहे तुमचे म्हणणे- 'पालकत्व शिकण्याची गरजच काय?' ते तर आपोआप यायला हवे. आपल्या अनुभवांतून, आई-बाबांशी असलेल्या संवादांमधून, त्यांच्याशी घडणाऱ्या चर्चेतून, त्यांना आपल्याशी व इतर लहानांशी वागताना बघून आपण आपोआप शिकतोच- नाही का?

खरे तर हे असेच होत असे. त्या काळात जेव्हा कुटुंब एकत्र होते, व्यक्ती-व्यक्तीतील संबंधांची जवळून माहिती होत होती. व्यक्ती-व्यक्ती संबंधांची ओळख होत होती. घरात मोठे-लहानांची काळजी घेताना दिसत होते. असे प्रेमाचे असंख्य अनुभव गाठीशी बांधत मुले मोठी होत असत. घरात अनेक मुले असत. मोठी मुले काही मोठ्या व्यक्तींच्या जवळ, तर काहींपासून लांब राहताना आपण पाहत होतो. घरच्या जवळच्या व्यक्ती व बाहेरील परक्या व्यक्ती यांच्या लहानांविषयीच्या सहिष्णुतेतील फरक अनुभवत होतो. घरातील व्यक्तींनी वेगळं वागायचे असते; लहान मुलांच्या भावनिक गरजा ओळखून, त्या सांभाळण्याची जबाबदारी आपली असते, हे दाखवणारे अनेक प्रसंग बघायला मिळत आणि यातूनच पालकत्वाची भावनासुद्धा निर्माण होत असे. मोठी मुले लहानांचे पालकत्व स्वीकारत व त्यांची काळजी घेत. या आपल्या शिक्षणात मुख्यत्वे घरातील जवळच्या मोठ्यांचा हातभार असायचा.

पण नंतरच्या काळात हे अनुभव कमी झाले. आपले अनुभव हे सख्ख्या भावंडांपर्यंत व

आई-बाबा आणि अगदीच असलेच तर आजी-आजोबांपर्यंत मर्यादित झाले आहेत. त्यातूनही आई कामाला जाणारी असली व आजी-आजोबा जवळ नसतील, तर ही अनुभवांची संख्या फारच कमी झाली आहे. अनुभवांचे स्वरूप पण बदलले. म्हणजे, आधीच्या काळात आपण घरी आल्यावर आई फ्रेश असे व प्रेमाने स्वागत करीत असे, विचारपूस करीत असे. नंतरच्या काळातील ऑफिसच्या कामाने दमलेली आई- कितीही इच्छा असली तरी तेवढ्या सहिष्णुतेने वागू शकत नाही. थोडक्यात- मुलांशी संयमाने, प्रेमाने, सहिष्णुतेने वागायचे असते याची समज देणारे वातावरण नाहीसे झाले आणि मुलांना मिळणारे ते अनुभव खूप कमी झाले. त्याऐवजी मुलांना शिस्त लावली पाहिजे, मुलांना अभ्यासाला लावले पाहिजे, मुलांशी कठोरच वागले पाहिजे, त्याशिवाय ते समजू शकत नाहीत- असे अनुभव देणारे वातावरण निर्माण झाले. तेच अनुभव घेऊन आपण पालक झालो आहोत. त्यामुळे मुलांना समजून घेऊन वागणे म्हणजे काय, सहिष्णुतेने वागणे म्हणजे काय, हे आजच्या पालकांना समजणे कठीण होऊन बसले आहे. त्यामुळे मुलांकडून मिळणाऱ्या सहकार्यात अडथळे येताना दिसत आहेत. 'मी तर त्याला सगळे मनाप्रमाणे देते/देतो आहे... सगळं तर त्याच्याच मनाप्रमाणे चालले आहे, तरी तो ऐकतच नाही', अशा प्रकारची वाक्ये सतत ऐकायला यायला लागलीत. मुले हाताबाहेर जाऊ लागलीत, मानसिक दृष्ट्या कमजोर होऊ लागलीत. आत्महत्या किंवा स्वतःबद्दलची न्यूनता, घृणा निर्माण होणाऱ्यांची संख्या वाढीस लागली.




थोडक्यात, भावना-भावनिकता यांचा योग्य मेळ व योग्य वापर समजणे कमी झाले, जी मनुष्यप्राण्याची नैसर्गिक गरज आहे. याचाच परिणाम म्हणून थोडे प्रेम मिळाले की हुरळून जाणे आणि थोडासा त्रास/ मनाविरुद्ध घटना घडली की, निराशा निर्माण होणे, हे दिसायला लागले. अशा व्यक्तींची संख्या वाढताना दिसायला लागली. जे तुरळक दिसत होते, ते सर्वसामान्य झाले. याचा परिणाम कामाच्या वातावरणावरसुद्धा होताना दिसत आहे. कामाचे स्वरूप व तेथील ताण-

तणाव हाताळण्याची क्षमता घटताना दिसायला लागली. साहजिकच त्याचे तीव्र पडसाद पुन्हा घरात उमटायला लागले. प्रेम व विश्वास कमी व्हायला लागला आणि संशय वाढीला लागला. दोस्ती संपण्याला, लग्नसंबंध मोडण्याला एक किंवा दोन अनुभव पुरायला लागले.

विचार करा- या वातावरणात आजची पिढी वाढते आहे. आज मुलांना लहानांशी प्रेमाने वागायचे असते याचे किती अनुभव मिळत असतील? या उद्याच्या पालकांच्या अनुभवांमध्ये काय आहे की, ते मुलांना घडायला पुरेसा वेळ देतील, मुलांशी धीराने वागतील? आपण त्यांना काय देतो आहोत? किती अनुभव त्यांच्या गाठीशी असतील? कोणत्या प्रकारचे अनुभव त्यांच्या गाठीशी असतील? आई-बाबा दोघे कामावर जाणार, मुलं सतत परक्यांसोबत असणार. तो प्रेमाचा, आपलेपणाचा जो अनुभव त्यांना मिळायला हवा आहे, तो वातावरणातून जवळजवळ नष्टच होत आलेला आहे. असे अनुभव वर्तमानात विरळाच. त्यात आजच्या मुलांची दिनचर्या, हाही प्रश्नच.

मुलांना सकाळी सात-साडेसातला स्कूलबसमध्ये बसावे लागते. शाळेतून आल्यावर पाळणाघर, नंतर काही क्लासेस. म्हणजे तेसुद्धा संध्याकाळी उशिरापर्यंत घराबाहेर असणार. मधून-मधून या क्लासमधून त्या क्लासमध्ये सोडण्यासाठी आई जरी भेटली, तरी त्यांच्यातील संवाद काही जिव्हाळ्याचे नसतातच. उशीर का झाला वा सारख्या चुका दाखवणे, त्रागा, उद्याचा अभ्यास-

**आधीच एकत्र वेळ कमी झाल्याने अनुभवांची संख्या कमी झाली आहे; त्यात अजून सगळे अनुभव हे जसे असायला हवेत, त्याऐवजी त्याच्याविरुद्ध टोकाकडेच जाताना दिसत आहेत. आणि अपेक्षा? त्या मात्र मुलांमध्ये खुलेपणा असावा, सहजीवनाची भावना असावी, त्यांना सामाजिकता समजावी, त्यांनी इतरांशी प्रेमाने वागावे- अशा आहेत. पण जर हे मूल अशा प्रकारच्या वातावरणात वाढलेलेच नसेल, तशा प्रकारचे अनुभवच त्याच्या गाठीला नसतील; तर ते हीच जीवनाची तत्त्वे (values) कशी समजणार?**

याभोवतीच ते संवाद असतात. थोडक्यात, आधीच एकत्र वेळ कमी झाल्याने अनुभवांची संख्या कमी झाली आहे; त्यात अजून सगळे अनुभव हे जसे असायला हवेत, त्याऐवजी त्याच्याविरुद्ध टोकाकडेच जाताना दिसत आहेत. आणि अपेक्षा? त्या मात्र मुलांमध्ये खुलेपणा असावा, सहजीवनाची भावना असावी, त्यांना सामाजिकता समजावी, त्यांनी इतरांशी प्रेमाने वागावे- अशा आहेत. पण जर हे मूल अशा प्रकारच्या वातावरणात वाढलेलेच नसेल, तशा प्रकारचे अनुभवच त्याच्या गाठीला नसतील; तर ते हीच जीवनाची तत्त्वे (values) कशी समजणार?

आपल्याच मनातल्या values तपासून पाहा- आपण नकळतपणे मुलांना काय देतो आहोत?

- कोणावर पटकन विश्वास टाकू नये.
- उगीचच कुणाशी जवळीक वाढवू नये.

- लोकांना अंतरावरच ठेवावे.
- गरज पडल्यास आपणसुद्धा दोन सुनवाव्यात.
केवढा विरोधाभास- ज्या values म्हणून सांगतो आहोत त्यात व जे वागायला सांगतो आहोत त्यात!
ही झाली शहरी मुलांची परिस्थिती.

निमशहरी व ग्रामीण भागाचा विचार केला तर यात वेगळेपण नक्कीच लक्षात येते. अजूनही नाती जपून आहेत. घरात काका-काकू, आजी-आजोबा आहेत. त्यामुळे मुलांना त्यांचा सहवास अजून मिळतो आहे. अगदी पूर्वीसारखी नसली तरी प्रेमभावना बऱ्याच प्रमाणात शिल्लक आहे. याच्याच परिणामी, ही मुले भावनिकदृष्ट्या शहरी मुलांपेक्षा जास्त सक्षम आढळतात. परंतु आई - बाबांवरचा कामाचा ताण तिथेही वाढलेला आहे. आई-बाबा उशिरापर्यंत कामावर असतात, दमून घरी येतात. मुलांकडे पाहण्यासाठी, त्यांचे ऐकून घेण्यासाठी त्यांनाही वेळ कमीच. याचबरोबर ग्रामीण भागाला शहराचे विशेष आकर्षण असते. शहरात होते ते योग्यच, ही सर्वसाधारण भावना. त्यामुळे मुलांकडून अपेक्षा तशाच. मुलांनाही मोबाईल, इंटरनेट इ. चे आकर्षण त्यातून आलेच. गुणांची स्पर्धा, इंग्लिश बोलता येणे, याचा ताण त्याही मुलांवर आहेच. मुलांनी योग्य वागण्यासाठी, मोठ्यांचे ऐकण्यासाठी, अभ्यास करण्यासाठी एक आणि एकच मार्ग अवलंबलेला दिसतो- तो म्हणजे मार देणे. मुलाबद्दल कोणतीही तक्रार येऊ देत, बहुतेक पालक पहिली गोष्ट करतात ती म्हणजे बडवून काढणे. अशी धारणाच आहे की, त्याशिवाय मुले ऐकतच नाहीत.

का आपण अपेक्षा करतो आणि त्यांना जमले नाही म्हणून शिक्षा करतो? फक्त ते आपल्यावर अवलंबून आहेत म्हणून? ते आपल्यापेक्षा लहान आहेत, काही करू शकत नाहीत म्हणून? यातून मुले घडणार आहेत का?

काय असते पालकत्व? पालकत्व म्हणजे खूप काळजीपूर्वक व्यक्तिमत्त्व घडवणं. मुलाची त्याची-त्याची एक नैसर्गिकता असते, त्यानुसार त्याची वाढ होणार असते; पण त्याच्या त्या वाढीच्या प्रत्येक टप्प्यावर त्याला वेगवेगळ्या आधारांची गरज असते. जसे- लहानपणी शरीर कमकुवत असते व हळूहळू ते घडत जाते, तशीच त्याची भावनिकता व बुद्धिमत्ता असते. जसे शारीरिक विकासाचेही टप्पे असतात, तसेच भावनिक विकासाचे व बुद्धिमत्ता विकासाचे टप्पे असतात. जसा लहानपणी शरीरावर अवास्तव जोर पडल्यास त्याच्या अवयवात व्यंग निर्माण होऊ शकते, अगदी तसेच भावनिक व बौद्धिक व्यंग निर्माण होऊ शकतात. शारीरिक व्यंग आपल्याला दिसू शकतात, भावनिक व बौद्धिक व्यंग व्यक्त स्वरूपात दिसत नाहीत; पण परिणाम स्वरूपात नक्कीच दिसू शकतात. जर आपली दृष्टी त्यासाठी तयार केली, तर आपल्याला ही व्यंगं स्पष्ट दिसू शकते. ती दिसायला लागली, तर लक्षात येईल आपल्या आजूबाजूला असलेल्या पालकत्वाचा दर्जा.
आता आपणच ठरवायचे आहे की, पालकत्व हे शास्त्रीय अभ्यासातून शिकण्याची गरज आहे किंवा नाही?

***

बालशिक्षण

गौरी पाटील

# बालस्नेही शिक्षण

बालकाच्या व्यक्तिमत्त्वविकासामध्ये कुटुंब, परिसर, शालेय वातावरण यांना अनन्यसाधारण महत्त्व असून बालकास या सर्वच ठिकाणी सुरक्षितता, प्रेम, आपुलकी मिळणे आवश्यक आहे. यातूनच बालकाचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्वविकास होतो.

मूल हे निर्सगत: शिकत असते. निसर्ग हा एक महान गुरू असून पक्ष्यांचा किलबिलाट, कोकिळेची कुहूकुहू, फुलपाखराचे भिरभिरणे, पाण्याचा खळखळाट, चिखलात खेळणे, झाडावर चढणे, पावसाळ्यात छोट्या-छोट्या कागदाच्या होड्या बनवून ओहळात सोडणे, आकाशात उंच उडणारे पक्षी, झाडांची पाने, फुले विविध रंग, इंद्रधनू पाहणे यांसारख्या अनेक गोष्टींतून मुलांना निखळ निर्मळ आनंद मिळतो. त्यांच्या विचारांची शृंखला विस्तारते. 'बिनभिंतींची इथली शाळा, लाखो इथले गुरू, झाडे, वेली, पक्षी, पाखरे यांशी दोस्ती करू' परंतु यासाठी गरज आहे ती, आपण सर्वांनी ठरलेल्या चौकटीतून बाहेर पडण्याची. तेव्हाच आपण बालकास बालस्नेही शिक्षण देऊ शकतो.' बालकांमधील खेळकर वृत्ती कायम टिकवून दिले जाणारे शिक्षण म्हणजे बालस्नेही शिक्षण होय.

''परंतु सन १९०० मध्ये मेकॉलेने जी शिक्षणपद्धती भारतामध्ये लागू केली, तिचा पगडा आजही भारतीय समाजमनावर शेकडो वर्षांनंतरही कायम असलेला दिसून येतो. संख्यात्मक आकडेवारीतून आमची शिक्षणव्यवस्था, शिक्षक व समाज बाहेर पडताना दिसत नाही याची मनाला खंत वाटते. एक-दोन टक्के गुण कमी पडले म्हणून आत्महत्या करणारी मुले पाहिल्यानंतर.... शिक्षणातून खरंच एक जबाबदार नागरिक निर्माण होतो का? मुलांचा खरा व्यक्तिमत्त्वविकास होतो का? परिस्थितीशी लढण्याची मुलांची चिकाटी हरवत तर नाही ना..? यांसारखे अनेक प्रश्न अनुत्तरित राहतात.

मूल हा मातीचा गोळा नसून तो अतिशय सजग, अनेकविध क्षमता असलेला शिकण्याची उपजत ऊर्मी असलेला, बुद्धिमत्तेचे अनेक पैलू व अनुभवाची प्रचंड शिदोरी घेऊन आलेला चैतन्याचा जिवंत झरा असतो.

'त्याच्या सर्व कलागुणांना वाव देण्यासाठी गरज असते ती, बालस्नेही सुलभ वातावरणाची.' 'शिकण्याची संधी निर्माण करून देते, तेच खरे शिक्षण होय.' यासाठी शिक्षकांनी मुलांना शिकण्याची आवड निर्माण होईल असे शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे, मुलांना स्वत: विचार करायला लागेल व विचारातून मुले निष्कर्षापर्यंत पोहोचतील अशा समस्या समोर ठेवणे गरजचे आहे. त्यासाठी शिक्षकांनी आपली मानसिकता बदलून वर्तनवादी शिक्षण पद्धतीतून बाहेर पडून ज्ञानरचनावादी, बालस्नेही शिक्षणपद्धतीचा अंगीकार करणे आवश्यक आहे.



अनुभव हा एक महान गुरू असून प्रत्यक्ष अनुभवातून विद्यार्थ्यांनी स्वत: मिळवलेले ज्ञान चिरकाल स्मरणात राहते. याच तत्त्वांचा अंगीकार करत जपान, फिनलँड... यांसारख्या देशांनी मुलांना अनभुवावर आधारित शिक्षण दिल्यामुळे जगाच्या नकाशात सर्वांत जास्त कौशल्यांचा विकास व आर्थिक-सामाजिक सुबत्ता त्या ठिकाणी आलेली आपणास दिसून येते.

'मनोरंजनातून बालस्नेही शिक्षण' हे माझ्या शाळेचे ब्रीदवाक्य असून संपूर्ण शालेय वातावरण मी बालस्नेही ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न करते. मुलांना दिले जाणारे संपूर्ण शिक्षण अनुभवावर आधारित असून मुलांना ट्रेन, गाड्या, घरे, नकाशे इ. वस्तूंचे सुटे पार्ट यांसह निसर्ग निरीक्षण करणे,

झाडांचे विविध आकार, फाद्यांमधील कोन शोधणे, यांसारख्या अनेक अनुभवांतून शिक्षण घेताना मुले एका वेगळ्या कल्पकतेत रममाण होऊन वस्तू बनवतात व निरीक्षण करतात; तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद गगनातही मावत नाही.

जे. कृष्णमूर्ती स्कूल, पुण्यातील अक्षरनंदन, कोल्हापूरमधील सृजन आनंद ग्राममंगल साताऱ्यातील जि.प. शाळांचा समूह असलेले कुमठे बीट यांसारख्या अनेक शाळांनी गेल्या काही वर्षांपासून ज्ञानरचनावादावर, अनुभवावर आधारित बालस्नेही शिक्षणपद्धतीचा अवलंब केल्याने, तेथील विद्यार्थ्यांचा वयोमानानुसार सर्वांगीण व्यक्तिमत्त्वविकास झालेला दिसून आला. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने हीच शिक्षणपद्धती 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' या कार्यक्रमातून संपूर्ण महाराष्ट्रभर राबविण्यासाठी उचललेले पाऊल ही बालस्नेही शिक्षणाची सुरुवातच आहे. यातून महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण व बालविकासात्मक बदल घडेल, यात तिळमात्र शंका वाटत नाही.

'बालस्नेही शालेय वातावणाबरोबरच मुलांना मिळणारे कुटुंबातील, परिसरातील वातावरण तितकेच आवश्यक असून पालकांकडून मुलांना सुरक्षितता मिळणे अत्यंत गरजेचे आहे. अनेक पालक आपल्या मुलांना अवास्तव अपेक्षांच्या ओझ्याखाली वागवत असतात.....'तुला काही जमतच नाही!', 'ती शेजारची मुलं बघ किती अभ्यास करतात!', 'तुला मोठं होऊन अमुकचं व्हायचंय' सारख्या अनेक प्रश्नांतून मुलांची उपेक्षा केली जाते.

त्याचा परिणाम मुलाच्या विकासावर होऊन त्याच्या मनामध्ये कायमच एक न्यनूगंड निर्माण होतो. त्याची बौद्धिक विचारांची शृंखला भावनिकतेकडे जाताना दिसून येते व मूल एकलकोंडे होते. यासाठी मुलांच्या स्व-अभिव्यक्तीला घरी स्वातंत्र्य देणे, त्याला आवडणाऱ्या गोष्टींसाठी बालस्नेही वातावरण निर्माण करून देणे. प्रत्येक जबाबदार पालकाचे कर्तव्य आहे.

बऱ्याचदा मुलांना दिलेला घरचा अभ्यास, अनेक प्रकल्प स्वत: पालकच करतात; तिथे मुलांच्या सर्जनशीलतेला वाव मिळत नाही व मूल परावलंबी होते. मूल चुकले तरी चालेल; एकदा चुकेल, दोनदा चुकेल... पण ते स्वत: एखादी गोष्ट करेल; तेव्हा त्यामध्ये ते निश्चितच परिपूर्ण होईल. मुलांची अतिकाळजी घेणारे किंवा अजिबातच विचार न करणारे पालक न होता, आपण सर्वांनीच मुलांचे मित्र होऊन त्याला आवड असणाऱ्या गोष्टींमध्ये सुसंधी निर्माण करून देणे आवश्यक आहे.

बालस्नेही शिक्षणाची संकल्पना सर्व पालक, शिक्षक, विद्यार्थी यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी ज्ञानरचनावाद, ई-लर्निंग, डिजिटल क्लास, टॅब्लेट स्कूल, बिल्डिंग ॲज ए लर्निंग एड या सर्व गोष्टींची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी मी www.balsnehi.in हे संकेतस्थळ सुरू केले असून, यामध्ये विद्यार्थ्यांसाठी नवनवीन संकल्पनांसह बालस्नेही शैक्षणिक कृती, विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन टेस्ट, कृतियुक्त संकल्पनांचे व्हिडिओ व अनुभव उपलब्ध करून दिले आहेत. या संकेतस्थळाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील अनेक शिक्षक, विद्यार्थी, पालक या शैक्षणिक माहितीचा लाभ घेत आहेत. बालस्नेही कृतियुक्त ज्ञानरचनावादी शिक्षणाची कास धरत आपण सर्वांनीच एक सशक्त, समृद्ध, प्रगत बालस्नेही भारत घडवू या...

***

नवी दिशा,

नवे शिक्षण

सुचिता पडळकर

# विषयांचे एकत्रीकरण : एक चर्चा

प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ नुसार नवीन क्रमिकपुस्तके तयार झाली. इयत्ता पहिली दुसरीच्या शिक्षकांच्या हाती अभ्यासक्रम पुस्तिका दिली. त्यानुसार शिक्षकांची प्रशिक्षणे झाली. इयत्ता पहिली-दुसरीसाठी मराठी भाषा, गणित आणि इंग्रजी ही तीन नवीन पाठ्यपुस्तके मुलांपर्यंत पोचली. यापूर्वीही या स्तरावर मराठी भाषा, गणित व इंग्रजी एवढीच पाठ्यपुस्तके होती. परंतु परिसर अभ्यास हा एक विषय स्वतंत्रपणे वेळापत्रकात होता. या विषयाचे पाठ्यपुस्तक नव्हते. शासनाने शिक्षकांसाठी तयार केलेली हस्तपुस्तिका मात्र उत्कृष्ट होती. राज्यभरातील मुलांचा परिसर वेगवेगळा असणार त्यामुळे प्रत्येकाने स्थानिक परिसरातील प्राणी, पक्षी, वनस्पती, पाणी स्रोत, हवा-हवामान, शेती व अन्न, वहातुकीची साधने, ऊर्जासाधने, लोकजीवन समजून घ्यावे असे अपेक्षित होते. अर्थातच, यासाठी, अनुभव घेणे, स्थलभेटी देणे, प्रयोग करणे, विज्ञान खेळणी बनवणे, माणसांना भेटणे त्यांच्याशी बोलणे इ. इ. बरेच करता येत होते. आपला नैसर्गिक परिसर, सांस्कृतिक परिसर, सामाजिक परिसर, परिसरात होणारे बदल, परिसर प्रश्नांची चर्चा असे विषयाची ओळख करून देताना शिक्षक करीत असत. विषयासाठी पाठ्यपुस्तक नसल्याने विषय व्याप्तीची मोकळीक शिक्षक घेत होते.

सध्याच्या अभ्यासक्रमाची रचना एकात्म केलेली आहे. आता इयत्ता पहिली, दुसरीसाठी परिसर अभ्यास विषयाला वेळापत्रकात वेगळा वेळ दिलेला नाही, तर भाषा आणि गणिताच्या अभ्यासक्रमात त्याचा समावेश केला आहे. प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २०१२ (इयत्ता पहिली व दुसरी) या पुस्तिकेत पाठ्यक्रमाची तीन टप्प्यात विभागणी (पृष्ठ १७) ४.१ पहिल्या टप्प्यामध्ये पुढे लिहिले आहे की, ‘‘नव्या अभ्यासक्रमात याच टप्प्यात परिसर अभ्यास या विषयात समावेश असलेल्या इतिहास,



भूगोल, नागरिकशास्त्र तसेच विज्ञान आणि आरोग्यशास्त्र यांची भाषा विषयाशी एकात्मता साधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.'' याच पुस्तिकेत भाषाशिक्षणाची एकोणतीस उद्दिष्टे मांडली आहेत त्यातील अखेरची चार उद्दिष्टचे परिसराशी निगडित आहेत. ती अशी -

१) परिसरातील झाडे, वेली, फुले, पाने, फळे, तसेच पशू-पक्षी, सरपटणारे प्राणी यांचे निरीक्षण करून, प्रश्न विचारून मिळालेली माहिती गटात, वर्गात सांगणे.

२) आपल्या परिसरातील स्वच्छता ठेवणाऱ्या व्यवस्थेची माहिती मिळवणे.

३) आपल्या गावातील महत्त्वाच्या ठिकाणांची माहिती गोळा करून गटात व वर्गात सांगणे.

४) वर्गात घडलेल्या महत्त्वाच्या घटनांच्या नोंदी दिनदर्शिकेच्या मदतीने दिवस व तारीखवार नोंदवणे.

या चारही उद्दिष्टांचा रोख माहिती गोळा करण्याकडे आहे. परिसर अभ्यासाच्या क्षमतांकडे पाहिले तर पुढील मुद्दे आढळतात.

१) नैसर्गिक व सामाजिक परिसराचे निरीक्षण करून त्यासंबंधी प्रश्न विचारता यावेत.

२) केलेल्या निरीक्षणाचे तोंडी निवेदन करता यावे.

३) गोळा केलेल्या माहितीचे संकलन करता यावे.

४) माहितीचे वर्गीकरण करता यावे.

५) [illegible]

६) सोपे प्रयोग करता यावेत.

७) नैसर्गिक साधन-संपत्तीचा योग्य व काटकसरीने उपयोग करावा.

८) व्यक्तिगत व परिसर स्वच्छता करावी, प्रदूषण टाळावे.

९) विविध धर्म, जाती यांच्या संस्कृतीचा आदर करावा.

१०) खाजगी व सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करावे.

११) व्यक्तिगत व सामाजिक

आरोग्य राखण्याची सवय लागावी.

आता आपण इयत्ता दुसरीच्या मराठी भाषा पुस्तकातून परिसर अभ्यास कसा शिकता येतो हे पाहू. याबाबतीत एक लक्षात घ्यायला हवे की भाषेच्या पाठांचे विषय परिसरातील असणारे हे उघड आहे. म्हणजे परिसराचा अभ्यास होतोच असे म्हणता येणार नाही. 'तरीही क्रमिक पुस्तकातील भाषा प्रधान पाठ आणि परिसर अभ्यासास अनुकूल पाठ अशी वर्गवारी केली तर परिसर अभ्यासास प्राधान्य देणारे पाठ पुढील आहेत.

१) पावसा पावसा ये! ये !

२) आठवड्याचा बाजार

३) थेंबा थेंबा येतोस कुठून

४) धाडसी मुकुंद

५) पवनचक्की

६) महिने

७) भाकरीची गोष्ट

८) संगणक

९) जंगलातील सफर

१०) परिसर स्वच्छता

११) चित्रवाचन

१२) हिरव्या हिरव्या झाडावर

एकूण अडतीस पाठांपैकी वरील बारा पाठांतून प्राणी, पक्षी, हवा, वनस्पती, शेतीच्या कामाचा क्रम, परिसरातील सण व व्यवसाय या घटकांना निश्चित स्पर्श होतो. परंतु या पाठाखालील स्वाध्याय पाहिले तर पाठातील आशयाचे आकलन तपासलेले दिसते किंवा शब्दसंग्रह वाढवणे, व्याकरणाची तयारी करून घेणे यावर भर आहे. वरील पाठातून व त्याच्या स्वाध्यायातून निरीक्षण, नोंदी, संकलन, निवेदन, वर्गीकरण, कार्यकारणभाव, अंदाज करणे, तुलना करणे, प्रयोग करणे अशा विज्ञान क्षमतांकडे लक्ष दिलेले दिसत नाही किंवा परिसरातील घडामोडींकडे पाहणे, विचार करण्याची क्षमता वाढवणे, या क्षमतांना स्थान दिलेले दिसत नाही. परिसर अभ्यासाच्या वर उल्लेखलेल्या सर्व क्षमतांच्या विकासासाठी आपला परिसर ही खुली प्रयोगशाळा आहे. आपण भाषेच्या क्रमिक पुस्तकात अडकून पडलो तर ही संधी आपण गमवू की काय असे वाटते. आमच्या, सृजन आनंद विद्यालयाच्या शिक्षकसभेत यावर विस्तृत चर्चा झाली. अनुभवातून -कृतीतून शिक्षणासाठी, विज्ञानाभिमुख शिक्षणासाठी भाषेच्या पाठांना समांतर पाठ तयार केले गेले. परिसराबद्दल स्पंदनशील होण्यासाठी तर्कशुद्ध विचारांची पायाभरणी कशी करायची याचा सविस्तर पट तयार केला आहे. तसे काम गेली चार वर्षे विद्यालयात होत आहे.

हे सर्व येथे लिहिण्याचा हेतू एवढाच की, भाषेच्या पुस्तकातून परिसराच्या अभ्यासास येणाऱ्या मर्यादांमुळे शिक्षकांच्या मनात अस्वस्थता असेल व त्यावर त्यांनी उपाय शोधले असतील तर त्याची चर्चा आपल्या सर्वांमध्ये व्हावी.

***

पुस्तक परिचय

कल्पना बन्सोड-डेव्हिड

# रचनावादी शिक्षणक्रांती




महाराष्ट्र हे प्रयोगशील राज्य आहे. अनेक क्षेत्रांतील नवनवीन प्रयोग या राज्याने केले आहेत. शिक्षणक्षेत्रातसुद्धा ही प्रयोगशीलता दिसून येते. सध्या महाराष्ट्रात शिकण्याची चळवळ सुरू झाली आहे. रचनावादाच्या चळवळीस उधाण आले आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. रचनावादी क्रांतीने अवघा महाराष्ट्र शिक्षणक्षेत्रात अव्वल होऊ पाहतो आहे. रचनावाद ही मुलांच्या शिकण्याची प्रभावी पद्धत आहे, हे शासनाने मान्य केले आहे. या शिक्षणक्रांतीतून महाराष्ट्रातील प्रत्येक मूल 'प्रगत' होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. सगळीकडे असे सुंदर दृश्य दिसत असताना 'रचनावादी शिक्षणक्रांती' हे प्रा. रमेश पानसे लिखित पुस्तक उपलब्ध व्हावे, ही आपल्यासाठी फार मोठी पर्वणी आहे.

प्रा. रमेश पानसे हे महाराष्ट्रातील नवक्रांतिकारक व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी 'ऐना' या गावात ग्राममंगल संस्थेची स्थापना केली. 'ग्राममंगल' म्हणजे रचनावादाचे माहेरघर. या संस्थेत मुलांना शिकवणे ही संकल्पना कालबाह्य झाली आहे. ग्राममंगल येथे मुलांना शिकण्याची संधी दिली जाते. मुलांबरोबर त्यांना समजून-उमजून काम केलं जातं. मुलांबरोबर शिक्षकही शिकतात. मुलांच्या शिकण्याच्या पद्धतींचा सखोल अभ्यास ग्राममंगल येथे झाला. यातून रचनावादाचा जन्म 'ग्राममंगल' या संस्थेत महाराष्ट्रात सर्वप्रथम झाला. इतिहासातील काही वैचारिक पाने आणि पानसेसरांच्या अनुभवातील काही प्रायोगिक पाने यांचा अभ्यास करून रचनावाद व त्यातील सर्व तत्त्वे पानसे सरांनी मांडली. या तत्त्वांची व अभ्यासाची मांडणी प्रथम त्यांनी अनेक वर्तमानपत्रांतून तसेच मासिकांतून लेखाच्या स्वरूपात केली. 'रचनावादी शिक्षणक्रांती' या पुस्तकात या सर्व प्रसिद्ध झालेल्या वैचारिक लेखांचा पुष्पपुच्छ आहे.

रचनावादी शिक्षणप्रणालीविषयी रमेश पानसे यांनी अनेक पुस्तकांमधून लेखन केले आहे. मागील पंचेचाळीस वर्षांपासून हे अभ्यासू नवयुवक शैक्षणिक विषयांवर वैचारिक लेखन करीत आहेत. रमेश पानसे यांनी रचनावाद या विषयावर गरजेनुरूप वेळोवेळी लेखन केले. हे लेखन आपल्याला विविध विषयांवरील (शैक्षणिक) असले, तरी एकाच पुस्तकात समुच्चय स्वरूपात मिळाले आहे.

'रचनावादी शिक्षणक्रांती' या पुस्तकात शिक्षणातील मूलभूत वैचारिक लेख आहेत. रचनावादाशी निगडित सर्वच बाजूंना हात घालत रचनावादावर प्रखर प्रकाश टाकणारे लेख आपल्याला या पुस्तकात भेटतात. पहिल्याच लेखात रमेश पानसे यांनी शिक्षणातील हुकूमशाहीच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातले आहे. 'शिक्षणाची नवी दिशा : लोकशाहीचे शिक्षण व शिक्षणातील लोकशाही' या प्रकरणात रमेश पानसे यांनी प्राथमिक शिक्षणातील मुलांना येती करण्याचा प्रश्न, त्यांना टिकती करण्याचा प्रश्न व त्यांना शिकती करण्याच्या प्रश्नांवर विचारमंथन केले आहे. या लेखात रमेश पानसेसरांनी थेट सरकारवर गोळीबार केला आहे. ते म्हणतात, 'शिक्षणावर सर्वतोपरी सरकारचीच हुकूमत आहे. आणि मुले आपली आपणच निसर्गत: शिकत असताना त्यांना बळजबरीने सरकारी बडग्याखाली शिकविण्याचा घाट घातला जातो.' या पुस्तकातील या लेखात प्राथमिक शिक्षणातील मूलभूत तीन प्रश्नांच्या संदर्भात सुधारणेच्या दिशेने काय होऊ शकेल, याचे अंदाजपत्रक मांडले आहे.

काळानुरूप बदल स्वीकारणे, ही काळाचीच गरज आहे. त्या दृष्टीने शिक्षणातसुद्धा बदल अभिप्रेत आहेत. 'शिक्षणात आमूलाग्र बदल' या प्रकरणात लेखकाने शिक्षणातील बदलाच्या प्रक्रियेवर प्रकाश टाकला आहे. राष्ट्रीय शिक्षणक्रम आराखडा (२००५) यातील शैक्षणिक उद्दिष्टे, दिशादर्शक तत्त्वे यावरचे सविस्तर विवेचन व परीक्षण लेखकाने या लेखात केले आहे. सोबतच यशपाल यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेतील 'शिक्षण ही काही वस्तू नव्हे, की ती पोस्टाने किंवा शिक्षकांकरवी पोहोचवता येईल'- अशा महत्त्वाच्या वाक्यांकरवी शिक्षणातील आमूलाग्र बदल हा लेख अतिशय रोचक झाला आहे.

'शिक्षणाचे बदलते संदर्भ' या प्रस्तुत लेखात लेखकाने काळाबरोबर शिक्षणाचे बदलत जाणारे संदर्भ यावर चर्चा केली आहे. शिक्षण हे सर्वस्वी शिकणाऱ्यासाठीच असते, शिक्षण नेहमी भावी कालाभिमुख असते, शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या गरजांची पूर्ती करणारे असते- अशा एक ना अनेक बदललेल्या संदर्भांना धरून लेखकाने आपली मते मांडली आहेत. या लेखात मज्जाशास्त्र व मज्जा-मानसशास्त्र या शास्त्रांची उकल विद्यार्थ्यांच्या दृष्टीने दिली आहे. मज्जाशास्त्र व मज्जा-मानसशास्त्राचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की, गेल्या कित्येक वर्षांपासून आपण मुलांवर अन्याय करीत आलो आहोत. आता ही वेळ मुलांना न्याय देण्याची आहे. चला तर, शिक्षणाचा नव्याने विचार करू या! हाच विषय घेऊन रमेश पानसे यांनी शिक्षणातील बारीक-सारीक बारकावे मांडले आहेत. या मांडणीत वर्तनवादी विचारसरणी, शिक्षणाचा नवा पाया- आकलनशास्त्र, भाषाशास्त्र, मानसशास्त्र, मज्जाशास्त्र व या शास्त्रातील संशोधनातील निष्कर्ष दिसून येतात. रचनावादी विचारसरणी काय आहे, याबद्दलचे स्पष्टीकरण या लेखात दिसून येते. या सर्व खटाटोपाचा मुख्य घटक म्हणजे विद्यार्थी. या विद्यार्थ्याचा विकास व गुणवत्तापूर्ण शिक्षण याचा सहसंबंध लेखकाने पुढील प्रकरणात मांडला आहे.

'विद्यार्थी-विकास : गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवहारासाठी काही तात्त्विक मीमांसा' या प्रकरणात लेखकाने विद्यार्थी-विकास या संकल्पनेकडे विशेष लक्ष वेधले आहे. ते म्हणतात, 'विद्यार्थी-विकास ही संकल्पना सर्वसामान्य असली, तरी ती सर्वसामान्य-स्थिर अशी संकल्पना नाही; तर ती विशिष्ट वयोमानाशी संबंधित आणि कालानुरूप बदलती अशी संकल्पना आहे.' मेंदूविकासनानुसार शारीरिक व बौद्धिक विकासाचे टप्पे ठरत असतात, हा मज्जाशास्त्रीय सिद्धांत प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावित केला आहे.

'शिक्षण कालानुरूप असावे' असे म्हणत असताना बदलत्या गरजांनुरूप शिक्षणाचा व्यवहार चालावा एवढेच अपेक्षित आहे. 'रचनावाद' महाराष्ट्रात सर्वदूर पोहोचला आहे. त्यामुळे 'रचनात्मक शिक्षण-आज आणि उद्या' या लेखकाने लिहिलेल्या लेखात बदलते शिक्षण, गरजेनुरूप शिक्षण, रचनात्मक शिक्षण कसे असावे- याचा विचार व व्यवहार मांडला आहे. शिक्षणव्यवहारात शिक्षकाची भूमिका व मानसिकतेचा विचार या वैचारिक लेखात केला आहे. एकंदरीत रचनावादाचा वर्ग, विद्यार्थी, शिक्षक यांचा समग्र विचार या लिखाणात केला आहे. या प्रकरणाला जोडूनच 'प्रचलित शिक्षणाला पर्याय :

रचनावाद' विषयाला लेखकाने हात घातला आहे. रचनावादाची सैद्धांतिक पार्श्वभूमी, रचनावादी शिक्षणव्यवहार, रचनावादाची व्यावहारिक तत्त्वे, रचनावादी वर्गाचे प्रारूप अशा अनेक बाबींवरील विचारप्रवाह या लेखात आले आहेत. 'वर्तनवादाकडून आकलनवादाकरवी रचनावादाकडे' या त्यांच्या लेखात लेखकाने नव्या शिक्षणाचा इतिहास पियाजेपासून मांडला आहे. या प्रकरणात संशोधनानुसार सिद्ध झालेली फलिते शिक्षणव्यवहाराच्या दृष्टीने मांडण्यात आली आहेत.

'निकोप शरीर' ही संकल्पना ऐकीवात आहे; परंतु निकोप शाळा, निकोप शिक्षण ही संकल्पनाच नवी आहे, पण ही संकल्पनासुद्धा निकोप आहे. शिकण्याचे आरोग्य कसे असणार, निकोपपण किंवा शाळेचे आजारपण याची कल्पना लेखकाने कल्पिली आहे. प्रस्तुत प्रकरणात शिक्षणप्रक्रियेविषयी लेखक लिहितात, 'शरीराने व मनाने निकोप असणारी मुले शिक्षणाला अधिक चांगल्या प्रकारे व दमदारपणे भिडू शकतात. त्यांचे शरीर व मन निकोप असेल, तर त्यांचे शिकणे प्रभावी होते.' निकोप शाळा व शिक्षणावरची अनेक निकोप गृहीतके लेखकाने प्रस्तुत भागात मांडली आहेत.

परीक्षा म्हटले की, प्रत्येकाच्या मनात 'धस्स होते' जणू हा ब्रह्मराक्षसच असावा!- मुलांवर परीक्षेचा प्रचंड ताण असतो. मुले मागे राहण्यात, रचनावादी शिक्षणात हा मोठा अडथळा आहे.' यावर रामबाण उपाय लेखकाने शोधून काढला आहे. 'परीक्षांचा मुलांवरील ताण जरा सैल करू या' या लेखात अतिशय समर्पक भाषेत लेखकाने परीक्षेचा ताण कमी केल्याचे दिसून येते.

अशा काही मोजक्या प्रकरणांविषयी मी इथे लिहिले आहे. परंतु त्याही पुढे लेखकाने लिखाण केले आहे. आपल्या गरजेची, उपयुक्ततेची पूर्ती करणारे हे मुद्दे आहेत. प्रत्येकाने वाचावेच, अशी प्रकरणांची रचना आहे. 'गुणवत्तावाढीची जबाबदारी संस्थाचालकाची!', 'बालकाच्या गरजेनुसार शिक्षण', 'रचनावादी शिक्षण: नवी शिक्षणक्रांती', 'रचनावादी शिक्षणाची व्यवस्था कशी व का?', 'कृतिशील स्वयंशिक्षण', 'शिकण्याच्या आड येणारे शिक्षण', 'शिक्षकदिनाच्या निमित्ताने', 'महाराष्ट्रातील शिक्षण बदलते आहे!', 'आपण खरंच आधुनिक आहोत काय?' यांसारख्या विषयांवर प्रा. रमेश पानसे यांनी विचारपूर्वक लेखन केले आहे. प्रत्येक विषयावर लेखकांने केलेले लेखन चिंतनीय आहे. नव्या युगाचा नवा शिपाई तयार करण्यासाठी या पुस्तकातील प्रत्येक लेख प्रेरणादायी आहे.

शिक्षणाने सुजाण नागरिकत्व निर्माण करायचे, हा दूरदृष्टिकोन ठेवून शिक्षण दिले पाहिजे. त्यासाठी शिक्षण सुदृढ असायचा हवे. सुदृढ शिक्षणासाठी शिक्षकांनी सुदृढ पुस्तके वाचावीत. असं म्हणतात- पुस्तकं माणसाचं मस्तक संपन्न करतं आणि संपन्न मस्तक कुणाचंच हस्तक नसतं. शिक्षणातील विचार पुस्तकरूपाने आपला दृष्टिकोन प्रगल्भ करतात. विचाराला चालना देतात. विचारातून सदसद्विवेक जागा होतो. हा विवेक आपणास विधायक मार्गाकडे नेतो, योग्य मार्ग दाखवतो.

रचनावादाची चळवळ मागील एका वर्षापासून सुरू आहे, परंतु केवळ तळफळे रंगवणे व साहित्य हाताळणे यामध्येच ही चळवळ वळवळ करीत आहे. रचनावादाची पहिली पायरी आपण गाठली आहे, वातावरणनिर्मिती झाली आहे. आता गरज आहे यापुढे जाण्याची, अर्थात दुसरी पायरी चढण्याची... त्यासाठी रचनावाद व त्याची सैद्धांतिक बैठक आपल्याला समजायला हवी, तरच आपण आपली दिशा ठरवू शकू. रचनावाद, त्याचे शास्त्रीय स्वरूप, तत्त्वे, नियम, गृहीतके, फलिते या सर्व बाबींविषयी 'रचनावादी शिक्षणक्रांती' या पुस्तकात लेखन करण्यात आले आहे. हे पुस्तक बालकांपासून पालकांपर्यंत, शिक्षकांपासून शासनापर्यंत प्रत्येकाला फार उपयोगी आहे. या पुस्तकाचे वाचन करून रचनावादाविषयक आपल्या सर्व शंका, संभ्रम दूर होतील यात तिळमात्र शंका नाही. या पुस्तकातून रमेश पानसे यांनी सर्वांना रचनावादाची अपूर्व भेट दिली आहे. आपण सर्वांनी ती स्वखर्चाने स्वीकारून त्याचा आस्वाद एकदा तरी घ्यावाच, असे मला वाटते.

**'रचनावादी शिक्षणक्रांती'- प्रा. रमेश पानसे, प्रकाशक : ग्राममंगल, मूल्य रु. २००/-**

**सौमित्र घोटीकर**

# योजनांमुळे ई-लर्निंग होईलच, असं काही नाही..!




**योजना छानच असतात हो**

डिजिटल इंडिया ह्या आणखी एका गोंडस नावाखाली पं. मोदीजी भारतात संगणकीय क्रांती आणू पाहत आहेत. त्या अंतर्गत अनेक योजना कार्यरत आहेत. कार्यक्रम-योजना या बहुतेक वेळी उत्तमच असतात हो; प्रश्न येतो त्यांच्या अंमलबजावणीचा. होतं कसं... एखादा धोरणात्मक निर्णय घेतला जातो, त्यानुसार योजना ठरवल्या जातात, सबंधित अधिकारी वगैरेंना त्याबद्दल माहिती दिली जाते, साहित्यही पुरविले जाते. हे त्या-त्या योजनेच्या अग्रक्रमानुसार त्वरित अथवा थोड्याफार विलंबाने होतं.

- पण पुढे? काही ठिकाणी, जिथे त्या-त्या योजनांचा अंमलबजावणी कार्यक्रम व्यवस्थितपणे मांडला गेला आहे किंवा कर्मचारी प्रशिक्षित आहेत अथवा केले गेलेले आहेत, तिथे त्यांचा उत्तम परिणाम दिसून येतो. परंतु जेथे हे नाही, तिथे मात्र पार बोंब होऊन जाते. आणि सरकारचे- परिणामी तुमचे-आमचे कोट्यवधी रुपये फुकट गेल्याचं आढळून येतं. पैसा तर जातोच; परंतु ज्या प्रेरणेतून या योजनांनी जन्म घेतलेला असतो, परिणामस्वरूप जो सुंदर परिणाम अपेक्षिला गेलेला असतो, तो न मिळाल्याने समाजाचं प्रचंड नुकसान होतं. आपल्या ज्ञान-अज्ञानाबद्दल ऐकलेली ३-४ वाक्यं :-

They Know what they know and they Know what they Don't Know
They Know what they know and but don't Know what they Don't Know
They don't know what they know and what they don't know
They don't know what they don't know

शब्दच्छल जाऊ द्या, परंतु त्या सुंदर परिणामाचीही बहुतेकांना कल्पना नसते (They don't know what they don't know). त्यामुळे हातातून काय निसटून गेलंय किंवा खूप उशिराने

येतंय, हेही त्यांना (म्हणजेच आपल्याला) ठाऊक नसतं. आणि कसं असणार? कारण आपण त्या युगपुरुषांसारखे द्रष्टे नाही. तरीही नुकसान व्हायचं ते होतंच. मला कोणकोणत्या योजनांमध्ये अंमलबजावणी झाली, झाली नाही याचा पाढा वाचायचा नाहीये; फक्त हे असं का होतं ह्याचा मात्र जरूर विचार व्हावा, असं वाटतं.

**का होत नसावी अंमलबजावणी?** - बहुतेक ठिकाणी 'ही काय नवी कटकट आणून ठेवलीये डोक्याशी!' अशीच भावना दिसते. खरं म्हणजे हे जे नवं असतं, त्याची मनाला उत्कंठा असायला हवीच ना! मनाचा नव्याकडे ओढा असतोच. नसता, तर नित्य नवे मोबाईल फोन, आकर्षक वस्तू, नवनव्या रूपात-स्वरूपात बाजारात कशा आल्या असत्या आणि लोकांनी त्या का बरं घेतल्या असत्या? जो कर्मचारी 'ही काय नवी कटकट?' असं एखाद्या नव्या योजनेला म्हणतो, तोच त्याचा नवा स्मार्ट फोन घेऊन दिमाखात फिरतो. म्हणजे नव्याचा तिरस्कार नाहीये, तर कामाबद्दल वेगळ्या प्रकारे विचार केला जातोय. कामातलं का असेना, तेही नवं Exciting वाटायला काय हरकत आहे? हे का वाटत नाही; तर ते काम कुणी दिलंय, त्यामुळे माझं कामच कसं वाढून बसलंय (जास्तीचं शिकणं) वगैरे.. गप्पा-गोष्टी करण्यातच बराच वेळ जातो, असं लक्षात येतं.

**अपेक्षित ऊर्जा येणार कोठून?** - मुळातच मनाचा सहकार नसेल तर शरीर, बुद्धी साथ देणंच शक्य नाही. त्यामुळे मग अशा योजनांची अंमलबजावणी- म्हणजेच शिक्षण व त्या नव्या पद्धतींनं ते अमलात आणणं- हे केवळ सोपस्कार म्हणून अस्तित्वात राहतात. मुळात काहीही नवं शिकणं हे जर प्रेरक, exciting वाटणारच नसेल, तर अपेक्षित ऊर्जा यायची कोठून?

**मग करायचं काय? -** मान्य; सगळेच लोकमान्य नव्हेत... मंडालेच्या तुरुंगातही, रोगट वातावरणातही जे स्वत:ला गीतारहस्य लिहायला प्रेरित ठेवू शकले! अशी मानसिकता आपली झाली तर? पण ते सोडू. आपण सर्वसामान्यांसारखेच आहोत, हे लक्षात ठेवून शासनाला काही गोष्टी तर निश्चित अमलात आणता येतील (ते तसं करत असतीलही) :

१. अपेक्षित परिणाम दृश्य स्वरूपात निदान काही मोजक्या प्रभावी व्यक्तींना (फक्त संबंधित खात्यांचे मुख्य नव्हे) तरी दाखविणे. (Visulaization)

२. अतिशय चांगल्या, प्रसन्न (posh नव्हे) वातावरणातही प्रशिक्षणे व्हावीत.

३. ही शिबिरं जर get together सारखी झाली, एखाद्या सहलीसारखी; तर अधिक चांगलं.

४. या शिबिरांचा हेतू लोकांच्या 'मनातलं काढून घेणे' वगैरे नसून त्यांच्या मनाने नवी योजना सुदृढपणे स्वीकारावी-घ्यावी, हाच असला पाहिजे.

५. समिती वगैरे करण्यापेक्षा कर्मचाऱ्यांचाच एक ग्रुप तयार करावा व पाठपुरावा करावा. तो बऱ्यापैकी informal ठेवावा. त्यात चेष्टा-मस्करीला थोडा वाव असावा.

६. विविध स्वरूपाची छोटी-छोटी (अगदी Cadbury वगैरे) बक्षिसे देत राहून त्यांना प्रेरित ठेवावे.

हे थोडं जरी टिपिकल वाटलं, तरी करायला हवं. आपापल्या कल्पनांनुसार वेगवेगळे उपक्रम राबविता येतील, पण करायला मात्र हवंच. शिक्षण हे रंजकच असतं, ते तसंच असतं हे पटवून (!) द्यावं लागतंय. पण करावं लागेलच, लवकरात लवकर; नाही तर पडून राहतील कोट्यवधी रुपयांचे laptops अधिकाऱ्यांच्या घरी, तेही वापराविना!

***

समुपदेशकाच्या नजरेतून

गंपूदादा / किशोरीताई

# विकास...

मुलांच्या विकासाचे टप्पे पार करत असताना पालक अनेकदा गोंधळून जातात. काय चूक, काय बरोबर, हा अंदाजच येत नाही. किंबहुना, जसं पारंपरिक पद्धतीने चालत आलं आहे, तसंच पुढे चालू ठेवणे हा मार्ग अवलंबतात. बऱ्याचदा काही पालक 'मला माझ्या मुलाला खूप चांगल्या पद्धतीने वाढवायचं आहे' म्हणून पालकत्वाचा अतिरेक करतात. मग या डॉक्टरला भेट, त्या डॉक्टरला भेट, वेगवेगळ्या समुपदेशकांना भेट- असं त्या पालकांचं सुरू होतं. मग चार दगडांवर पाय ठेवत, कुठल्याही एका दगडावर विश्वास न ठेवता तोंडावर आपटतात.

मूल जन्माला आल्यावर त्याच्या पद्धतीने शिकत, विकासाचे टप्पे पार करत असतं. हे पालकांना मान्य करायला थोडं अवघड जातं. हे मान्य करून मुलाला फक्त मार्गदर्शन केल्यास खरं तर मुलाचे बरेच प्रश्न कमी होणार आहेत.

मुलाच्या विकासाचा विचार करताना चार प्रमुख विकास लक्षात घेतले पाहिजेत आणि ते म्हणजे

* शारीरिक विकास * बौद्धिक विकास * मानसिक विकास * सामाजिक विकास

**शारीरिक विकास :**

शारीरिक विकासाचा विचार करताना मुलाची योग्य वयात योग्य शारीरिक वाढ होत आहे ना, हे पाहणे. म्हणजे वयानुसार मुलाची शारीरिक वाढ होत आहे का, हे पाहणे. शारीरिक वाढीचा विचार करताना आनुवंशिकतेचादेखील विचार करण्याची गरज आहे. कारण मैत्रिणीच्या मुलाची उंची माझ्या मुलाच्या उंचीपेक्षा जास्त. असं वाटून मग माझ्या मुलाची उंची वाढावी म्हणून बाजारात उपलब्ध असलेली वेगवेगळी ड्रिंक्स मुलाला देत राहणे- हे कितपत योग्य आहे, हा विचार करण्याचा विचार आहे. शारीरिक वाढीचा किंवा विकासाचा विचार करताना माझे मूल खालील गोष्टींची पूर्तता करते आहे का, हे पाहणे महत्त्वाचे आहे.

* सर्वप्रथम पौष्टिक आहार

* शारीरिक हालचाल, व्यायाम

* वयानुसार खेळ

* लवचिकता जोखली जाईल असे व्यायाम.



**बौद्धिक विकास :**

बौद्धिक विकास होत असताना मूल त्याच्या-त्याच्या वयानुसार वेगवेगळ्या कृती करत आहे का, हे पाहाणे.

उदा. मुलाला सारख्या गोष्टी एकत्र करता येणे- अनुकरण करता येणे हे साधारणत: वयाच्या दीड ते अडीच वर्षापर्यंत यायला हवं. वयाच्या त्या-त्या टप्प्यावर विकास होत आहे का, याचे मार्गदर्शन तज्ज्ञांकडून घ्यायला हरकत नाही; परंतु त्याचा अतिरेकी वापर करता कामा नये.

**मानसिक विकास :**

मुलाच्या प्रत्येक टप्प्यावर योग्य तो मानसिक विकास होणे यामध्ये मुख्यत: पालकांचा सहभाग तसेच आजूबाजूचे वातावरण कारणीभूत असते. मुलाच्या मानसिक विकासाकडे विशेष लक्ष द्यावे लागते. कारण मानसिक प्रश्न यायला सुरुवात झाली, तर हे प्रश्न शारीरिक, बौद्धिक, तसेच सामाजिक विकासावर परिणाम करतात. अगदी घरात लहान बाळ आल्यामुळे 'ते कुणी माझे कुणी ऐकतच नाही' इथपर्यंतचे सर्व मानसिक प्रश्न योग्य वेळी व योग्य रीतीने हाताळणे व सोडविले गेले पाहिजेत.

**सामाजिक विकास :**

जितके वरील तीनही विकास महत्त्वाचे आहेत, तितकाच सामाजिक विकासही महत्त्वाचा आहे. कारण माणूस हा समाजप्रिय आहे. वेगवेगळ्या गरजांमुळे प्रत्येक जण एकमेकाशी जोडला गेलेला असतो. अगदी मुलांच्या बाबतीत म्हटलं तर 'तो मित्र मला चॉकलेट देतो, म्हणून तो माझा बेस्ट फ्रेंड आहे.' किंवा 'ती ताई माझं ऐकते, म्हणून ती ताई मला आवडते' अशा छोट्या-छोट्या गोष्टींमुळे मुले समाजात मिसळायला सुरुवात होते.

मुलाच्या वयानुसार मुलाला त्याच्या वयाच्या गटात रमता येणे, त्याच्या वयाच्या मुलांशी संवाद साधता येणे, त्यांच्याशी निकोप मैत्री करता येणे या गोष्टी सामाजिक विकासाचा एक भाग आहेत. वरील चारही विकास हे मुलाच्या निकोप वाढीसाठी गरजेचे आहेत.

नाही तर पी. सिंधू, क्रिकेटचा देव सचिन, गानकोकिळा लता मंगेशकर हे फक्त दुसऱ्याच्या घरात जन्माला येतील आणि आपण फक्त त्यांचे कौतुक करत राहू.

***